नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक ५ * * चंद्रपूर * | शनिवार, दिनांक ५ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## पतंजली च्यवनप्राशच्या जाहिरातीवर बंदी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :**
दिल्ली उच्च न्यायालयाने पतंजलीला डाबर च्यवनप्राशविरुद्ध कोणतीही नकारात्मक किंवा दिशाभूल करणारी जाहिरात दाखवू नये असे निर्देश दिले. डाबरने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी केल्यानंतर न्यायमूर्ती मिनी पुष्कर्ण यांनी हा आदेश दिला.

डाबरने न्यायालयात युक्तिवाद केला की अशा जाहिराती त्यांच्या उत्पादनाची केवळ बदनामी करत नाहीत तर ग्राहकांची दिशाभूल देखील करतात. च्यवनप्राश हे एक पारंपारिक आयुर्वेदिक औषध आहे, जे औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यांतर्गत नियमांनुसार तयार केले पाहिजे. इतर ब्रँडना सामान्य म्हणणे चुकीचे, दिशाभूल करणारे आणि हानिकारक आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### ट्रम्पची दादागिरी परवडेल काय

भारत आणि अमेरिका मित्र देश आहेत. भारताने स्वातंत्र्य मिळाल्यावर तत्कालीन अमेरिका किंवा सोवियत संघ यापैकी कुणालाही महत्त्व न देता आपला वेगळा मार्ग चोखळला होता. भारताने दोन्ही पक्षांशी दोस्ती ठेवली. पण एकतर्फी कोणासोबतही गेला नाही. आता गेल्या काही वर्षांमध्ये जगातील परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. सोवियत संघाची शकले उडाल्यावर रशिया अमेरिकेच्या तुलनेत बऱ्याच मागे पडलेला आहे. अमेरिकेला आता आव्हान देण्यासाठी रशिया पेक्षा चीन प्रचंड वेगाने पुढे आलेला आहे. पण तरीही अमेरिका आजही जागतिक महासत्ता आहे, यात वाद नाही. या महासत्तेचा फायदा आपल्या देशाला व्हावा. असा प्रचार करून डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आलेले आहेत. ट्रम्प यांचा उतावळा स्वभाव आणि बेदरकारपणे मनमानी करण्याची त्यांची पद्धत कुणालाही आवडत नाही आणि आवडणारही नाही. अमेरिकेने भारताबरोबर सध्या तरी उभा दावा मांडलेला दिसतो. ट्रम्प यांचे पाकिस्तान प्रेम उतू चाललेले आहे. अमेरिकेने भारतातील आयातीवर सव्वीस टक्के शुल्क लावले होते. मात्र नंतर एकूण परिस्थिती पाहिल्यावर याच ट्रम्पने आपल्याच निर्णयाला स्थगिती दिली. ती स्थगिती नव्वद दिवसांची होती. दोन-तीन दिवसात हे 90 दिवस पूर्ण होणार आहेत. तोपर्यंत अमेरिकेला आणि भारतालाही व्यापारी करार करण्याची इच्छा आहे. पण अजून तरी या कराराचे घोडे अडलेलेच आहे. भारत अमेरिकेतून घेत असलेल्या मालावर 17 टक्के आयात शुल्क लावतो. अमेरिका मात्र आतापर्यंत तीन साडेतीन टक्क्यांपेक्षा थोडा जास्त कर लावतो. म्हणजेच भारतातील मालाला अमेरिकेत कमी आयात शुल्क दरामध्ये प्रवेश मिळतो. आता ट्रम्प यांनी यावरच आक्षेप घेतलेला आहे. या व्यापारी वाटाघाटीचा घोळ बरेच दिवसापासून सुरू आहे. आता अमेरिका भारताने अमेरिकेतील वस्तू खरेदी कराव्यात म्हणून अडून बसलेला आहे. त्यामध्ये पेट्रोल, गॅस, बोइंग विमाने, हेलिकॉप्टर आणि इतर अनेक वस्तू अमेरिकेकडून खरेदी करण्यासाठी अमेरिका भारतावर दबाव टाकत आहे. अमेरिके कडून आपण क्रूड ऑइल घेतले. तर ते रशियापेक्षा तब्बल 30% महाग आहे. भारतात अमेरिकेचा शेतीमाल आयात करण्यासाठी ट्रम्प प्रचंड अधीर आहेत. त्यांना आपला सोयाबीन, मका आणि डेअरी मधले पदार्थ यासाठी भारताची बाजारपेठ हवी आहे. भारताने जर असे केले तर भारतातील शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडणार आहे. अमेरिकेच्या शेतकऱ्यांना प्रचंड सरकारी मदत मिळते. म्हणून त्यांचे भाव कमी आहेत. अशा स्थितीमध्ये अमेरिकेतील जीएम पिकांच्या आयातीला भारताने परवानगी दिलेली नाही. जर भारताने अमेरिका सांगते तसे करार केले. तर भारतातील शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. दोन्ही देशांच्या चर्वीतचर्वणाचा जागतिक पातळीवर ही फारच मोठा प्रभाव पडणार आहे. ट्रम्प यांना कसेही करून भारताची बाजारपेठ काबीज करावयाची आहे. पण जर तसे झाले तर आपला शेतकरी परिपूर्णपणे नागावला जाईल. आपण अमेरिकेच्या वाघाच्या डरकाळीपुढे टिकू शकणार नाही अशी स्थिती आहे. ट्रम्प यांनी दिलेली त्यांच्याकडील आयात शुल्कावरील सवलत चार दिवसात संपणार आहे. जर त्यांनी आपला २६ टक्क्यांचा हेका कायम ठेवला. तर भारताचा माल महाग होईल. आपली निर्यात कमी होईल. आपला माल म्हणजेच अमेरिकेचा माल विकण्यासाठी भारताचा माल महाग करणाऱ्या या लहरी माणसासमोर ज्याचे नाव ट्रम्प आहे. त्याच्यासमोर आपले सरकार ठाम राहते की त्याच्या दबावाखाली झुकते. यावरच आपल्या देशाचे आणि शेतकऱ्यांचे पुढचे भवितव्य अवलंबून आहे अमेरिकेच्या दादागिरी समोर आपण झुकलो तर आपला शेतकरी मरणार आहे नाही. मात्र जर चुकलो नाही तरच आपला शेतकरी जिवंत राहील. अन्यथा आत्महत्या तशाच राहतील. किंबहुना त्यामध्ये वाढ होईल. आपण यापुढे देश म्हणून किती ठाम राहतो. यावर यापुढचा सारा खेळ अवलंबून आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिला
# 'जय गुजरात' चा नारा

■ अमित शहांपुढे फोडले वादाला तोंड : लोटांगण घातल्याचा विरोधकांचा आरोप ■

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ४ :**
राज्यात मराठी भाषेच्या मुद्द्यावरून चांगलेच वातावरण तापलेले आहे. मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे उद्या विजयी मेळावा साजरा करत आहेत.

मात्र या मेळाव्याच्या आदल्याच दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या हातात आयते कोलीत दिले आहे. अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यातील एका कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी गुजरातची घोषणा दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या उपस्थितीत पुण्यात



विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अशाच एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'जय गुजरात' अशी घोषणा करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे आता अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

सत्ताधारी महायुती सरकारवर गुजरात धार्जिणे असल्याचा आरोप विरोधकांच्या वतीने केला जातो. मुंबईतील अनेक महत्त्वाचे उद्योग हे गुजरातला पळवले जात असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गट करत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी दिलेली घोषणा वादग्रस्त ठरणार आहे.

### जिनके घर शिशे के...

एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे.
शिंदे म्हणाले, मराठी हा आमचा श्वास आहे, हिंदुत्व आमचा आत्मा आहे.
मराठीबद्दल जे काही टीका करायचे काम करत आहेत. मी यावर भाष्य करू इच्छित नाही. परंतु, जिनके घर शिशे के होते हें वो दुसरों के घर पर पत्थर नहीं फेका करते, असे म्हणत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंची एक व्हिडिओ क्लिप दाखवली. त्यत्त ठाकरे एका सभेत जय गुजरात असे म्हणताना दिसत आहेत.

### वॉशिंग मशीनचा परिणाम नाना पटोले यांची टीका



या सरकारचा वास्तविकपणा, महाराष्ट्राच्या मातृभूमीबद्दल आणि मातृ भाषेबद्दल या सरकारचे मत काय? हे आता स्पष्ट झाले आहे. हे सर्वजण गुजरातच्या वॉशिंग मशीन मध्ये धुतले गेलेले आहेत. गुजरातच्या वॉशिंग मशीनचा यांच्यावर झालेला परिणाम अद्यापही उतरलेला नसल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

### गुजराती नेत्यांसमोर लोटांगण



जय हिंद हे आपल्या देशावरचे प्रेम आहे. जय महाराष्ट्र हे महाराष्ट्र राज्यावरचे प्रेम आहे. मात्र जय गुजरात म्हणजे हिंदी बरोबर आता गुजराती शिकणे देखील बंधनकारक होईल याची सुरुवात एकनाथ शिंदे करून देत आहेत का? असा प्रश्न ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी उपस्थित केला.

तुम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन चाललो असे लोकांना भासवत आहात. मात्र, त्यामध्ये जय गुजरात असा नारा कधीच बाळासाहेबांचा नव्हता, शिंदे यांनी गुजराती नेत्यांसमोर लोटांगण घातले असा आरोप पेडणेकर यांनी केला आहे.

### विनाशकाले विपरीत बुद्धी



पुण्यात जाऊन एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी घोषणा का दिली? विनाशकाले विपरीत बुद्धी असे म्हणतात. एकनाथ शिंदे यांना भेटल्यानंतर कसे आहात ऐवजी, केम छो? असे विचारायचे का? स्वतःच्या पायावर धोंडा टाकून दुसऱ्याला खुश करणार असेल तर मुबारक हो, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## इतिहासाचे विकृतीकरण : शहा

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ४ :**
श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी ४१ युद्ध केले आणि एकाही युद्धात पराभव होऊ दिला नाही. ते स्वतःसाठी नाही तर देश आणि स्वराज्यासाठी लढत होते. ते स्वराज्याचे केवळ पंतप्रधान होते. त्यांच्यात इतका पराक्रम आणि एवढी मोठी शक्ती असताना देखील ते पेशवेच राहिले, इंग्रजांनी इतिहासाचे विकृतीकरण करण्याचा प्रयत्न देखील केला. मात्र, ते यशस्वी झाले नसल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे.

पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथील थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळा अनावरण शहा यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. बाजीराव पेशवे ते स्वतःसाठी लढले नाहीत. तर देश आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यासाठी लढले. त्यांचे प्रत्येक युद्ध हे मातृभूमीसाठी, धर्मासाठी आणि स्वराज्यासाठी होते. आपल्या ४० वर्षाच्या जीवनात त्यांनी अमर इतिहास लिहिण्याचे काम केले. पुढील अनेक शतके ते कोणीही करू शकणार नाहीत, असे शहा म्हणाले.

**एनडीए पुणे स्मारकासाठी योग्य जागा**

पेशवा बाजीराव यांचे स्मारक बनवण्याची योग्य जागा ही एनडीए पुणे अकादमीच असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे.

देशातील तिन्ही सेनांचे आगामी काळातील सूत्रधार ज्या ठिकाणी प्रशिक्षित होऊन निघतात. त्या ठिकाणी बाजीराव पेशवे यांचा पुतळा उभारणे आणि त्यांच्या या मूर्तीपासून प्रेरणा घेऊन, त्यांच्या जीवनाचा अभ्यास करून आपल्या भविष्यातील सैनिक जाणार असतील तर अनेक वर्षापर्यंत भारतीय सीमा भागाला हात लावण्याचा कोणीही हिंमत होणार नाही. असा मला विश्वास असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे.

आजची युद्धाची परिस्थिती आणि बाजीराव पेशवे यांच्या काळातील युद्धाची पद्धती, यांच्यात काय साम्य असल्याचा प्रश्न विचारला जातो. मात्र, युद्ध कलेच्या पद्धतीत काही कला या कायम असतात. यामध्ये युद्धामधील व्यूव रचना, त्वरित निर्णय घेण्याची क्षमता, समर्पण, देशभक्तीचा भाव आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बलिदानाचा भाव. हेच सैनिकांना विजय मिळवून देते, असे ते म्हणाले.

## मराठा साम्राज्यातील अनेक नायकांवर अन्याय



ब्रिटीश व काही स्वदेशी इतिहासकारांनी मराठा साम्राज्यातील अनेक नायकांवर अन्याय केल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे बोलताना केला.

इंग्रजांनी व काहीअंशी स्वकियांनीही आपल्या इतिहासातील अनेक नायकांवर अन्याय केला. किंबहुना आपल्या हिंदवी स्वराज्याचा व मराठी साम्राज्याचा इतिहासच इतिहासातून डिलीट करून टाकला, असे ते म्हणाले.

फडणवीस यांनी मराठ्यांचा इतिहास जनतेपर्यंत अर्धवट पोहोचवण्यास इंग्रज व काही स्वदेशी इतिहासकार जबाबदार असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, थोरल्या बाजीराव पेशव्यांची वेग हीच सर्वात मोठी रणनीती होती. जेव्हा मोगल साम्राज्याची सेना एका दिवसात ८-१० किलोमीटर प्रवास करायची, तिथे थोरल्या बाजीरावांनी एक अशी सेना तयार केली की, ती एका दिवसात ६०-७० किलोमीटर प्रवास करत होती. हेच त्यांचे युद्ध कौशल्य होते. काही ब्रिटिश व काही स्वदेशी इतिहासकारांनी मराठा साम्राज्यातील आमच्या अनेक नायकांवर घोर अन्याय केला, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

## महामंडळ वाटपाचे ठरले


भाजप ४८ टक्के, शिंदेसेना २९ टक्के, राष्ट्रवादी २३ टक्के

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :**
आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे.

या पार्श्वभूमीवर आता महायुतीमधील महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला देखील निश्चित झाला आहे. त्यानुसार सर्वाधिक आमदार असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या वाटेला सर्वाधिक ४८% पदे येणार आहेत. शिवसेनेच्या वाटेला २९ टक्के तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला २३ टक्के महामंडळे येणार आहेत.

स्थानिक संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना भर देण्यासाठी महायुतीमधील महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. यासाठी अ-ब-क असे वर्गीकरण देखील करण्यात येणार आहे.

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून तिन्ही पक्षांमध्ये सत्तेच्या वाटाघाटी वरुन अनेक दिवसांपासून चर्चा सुरू आहे. मंत्रिमंडळ विस्ताराला झालेला उशीर, नंतर खाते वाटपासाठी झालेला उशीर, पालकमंत्री पदावरून वाद अद्याप संपलेला नाही. त्यातच महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. महामंडळावर वर्णी लागण्यासाठी आजी - माजी आमदार, मोठे नेते, पदाधिकारी उत्सुक आहेत.




### विधीमंडळात हक्कभंग प्रस्तावाला मंजूरी
## कामरा, अंधारेंच्या अडचणीत वाढ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
मागील विधीमंडळाच्या अधिवेशनादारम्यान कॉमेडियन कुणाल कामरा आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. आता पावसाळी अधिवेशनात प्रस्ताव मंजूर झाला आहे. त्यामुळे या दोघांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

कुणाल कामराने त्याच्या एका शोमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक गाणे गायले होते. एकनाथ शिंदे यांनी केलेले बंड तसेच त्यांची दाढी चष्मा यावरून कुणाल कामराने विडंबनात्मक गाणे गायले होते. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत जिथे कार्यक्रम झाला होता तिथली तोडफोड केली होती. मुंबईतील काही पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता.

सुषमा अंधारे यांनी देखील कुणाल कामराचे गाणे गात एक व्हिडिओ बनवला होता. त्यामुळे या दोघांच्या विरोधात हक्कभंग दाखल करण्यात आला होता. त्या प्रस्तावाला आता मंजूरी मिळाली आहे.

### वाचाळवीर, कंत्राटदार आमदारांचे धरले कान
## देवेंद्र फडणवीस सरांचा क्लास

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्नेह भोजनाच्या निमित्ताने महायुतीमधील वाचाळवीर आणि कंत्राट घेणाऱ्या आमदारांचे चांगलेच कान धरले.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी सरकारी कॉन्ट्रॅक्ट्स मिळवण्याच्या मागे लागू नका, असा सल्ला देखील दिला. सध्या पावसाळी अधिवेशन सुरु आहे. आणि अशा काळात विरोधकांच्या हाती आयते कोलीत न देण्याची सक्त ताकीद देखील फडणवीस यांनी दिली आहे.

भारतीय जनता पक्षाचे संस्कार हे वेगळे आहेत. त्यानुसारच पुढे जा, विकासाची कामे करताना आपल्या मतदारसंघाचे हित कशात आहे, त्याचा विचार करूनच ती कामे करा. असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय जनता पक्षाच्या आमदारांना दिला आहे.

सरकारी कॉन्ट्रॅक्ट्स मिळवण्याच्या मागे लागू नका. सरकारच्या विरोधात फेक नरेटिव्हच्या मुद्द्यावरूनही त्यांनी आमदारांना कान मंत्री दिला. विरोधकांनी फेक नॅरेटिव्ह तयार करायच्या आधीच सरकारच्या आणि पक्षाच्या बाजूने नॅरेटिव्ह तयार करा, असा सल्ला देखील फडणवीस यांनी आमदारांना दिला आहे.

फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वर्षा निवासस्थानी आमदारांच्या स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फडणवीस यांनी अशा आमदारांची कानउघाडणी केली.

## ९० दिवसांत मॉल्सचे ऑडिट नसल्यास पाणी, वीज तोडणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**
मुंबईसह राज्यभरातील मॉल्समध्ये आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना राज्य सरकारने आता फायर सेफ्टीबाबत कठोर भूमिका घेतली आहे. आगामी ९० दिवसांत सर्व मॉल्सचे अग्निसुरक्षा ऑडिट पूर्ण करावे, असे आदेश सर्व महापालिकांना देण्यात येणार आहेत.

यानंतरही सुरक्षा निकष पूर्ण न करणा?या मॉल्सची वीज व पाणी जोडणी तोडण्याची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिला.

विविध शहरांतील मॉलला परवानगी देताना होत असलेली अनियमितता आणि आगीचे वाढते प्रकार या संदभार्तील प्रश्न सदस्य कृपाल तुमाने यांनी उपस्थित केला होता. तसेच विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मागील वेळेस मॉलला लागलेल्या आगीनंतर ७५ मॉलच्या अग्निसुरक्षा तपासणीचे आदेश देण्यात आले होते.

त्यापैकी २६ मॉलला नोटीस देण्यात आली होती. केवळ नोटीस देऊन उपयोग नाही, त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जात नाही असा मुद्दा दानवे यांनी उपस्थित केला.



उदय सामंत म्हणाले की, मुंबईतील मॉलला मोठ्या प्रमाणात लागलेल्या आगीसंदर्भात यापूर्वीच मुंबई महापालिकेने सर्व मॉलचे फायर ऑडिट करण्याचे आदेश दिलेले आहेत. कायद्याच्या तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर कारवाई केली जाते. ७५ मॉलपैकी ५ ते ६ मॉलवर कडक कारवाई करण्यात आली असून उर्वरित मॉल बंद असल्याचे महापालिकेत घेऊन सांगण्यात आले आहे.

## राज्याच्या समुद्रकिनारी असलेल्या कांदळवनांचे सर्वेक्षण सुरू : गणेश नाईक



**मुंबई :** गुजरातच्या सीमेपासून ते गोवा राज्याच्या सीमेपर्यंत राज्याच्या समुद्रकिनारी कांदळवन आहेत. या कांदळवनांचे वनविभागाच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू आहे. यामुळे लवकरच कांदळवनांच्या अचूक क्षेत्रफळाची माहिती मिळणार आहे, असे वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य भास्कर जाधव यांनी प्रश्न उपस्थित केला होता. प्रश्नाच्या उत्तरात वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, पालघर जिल्ह्यातील कांदळवनांच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही लावण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वन , महसूल व गृह विभागाच्या अधिकाऱ्यांनी आळीपाळीने कांदळवनांच्या संरक्षणासाठी गस्त घालण्याचेही सूचित करण्यात आले आहे. मुंबईतील डेब्रिज कांदळवनांमध्ये टाकताना आढळल्यास त्यावरत कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कांदळवनांच्या संवर्धनासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिकाही दाखल करण्यात येईल, अशी माहितीही वनमंत्री नाईक यांनी दिली.

## कांदळवनांच्या संरक्षणासाठी 'कार्बन क्रेडिट' देण्याबाबत शासन सकारात्मक : पंकजा मुंडे



**मुंबई :** समुद्रकिनारी असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये अथवा वैयक्तिक जागेत कांदळवन आहेत. या कांदळवनांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना ताकद दिली जाईल. अशा जागांमधील कांदळवनांच्या संरक्षणाकरिता ' कार्बन क्रेडिट' देण्याबाबत शासनाकडून सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. पालघर जिल्ह्यातील कांदाळवनांच्या अतिक्रमणाबाबत सदस्य स्नेहा दुबे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य मनीषा चौधरी, संजय केळकर , राजेंद्र गावित यांनीही सहभाग घेतला. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, कांदळवनांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. कांदळवनांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी वन विभागाकडे ' मॅंग्रोव्ह सेल ' कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या समुद्रकिनारी असलेल्या कांदळवनांचे ऱ्हास करून पर्यावरणाचा असमतोल निर्माण करणाऱ्या घटकांवर निश्चितच कारवाई केली जाईल.

## अंधेरी येथील ईएसआयसी हॉस्पिटल लवकरच आरोग्य सेवेसाठी सज्ज : प्रकाश आबिटकर



**मुंबई:** राज्यातील जनतेला उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी शासनाने प्राधान्य दिले आहे. अंधेरी येथील ईएसआयसी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे दुरुस्ती व नूतनीकरण काम प्रगतीपथावर आहे. हे काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होऊन हे हॉस्पिटल सर्व सुविधांसह जनतेच्या सेवेसाठी सज्ज करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. या संदर्भात सदस्य मुरजी पटेल यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य सीमा हिरे, तुकाराम काते यांनी सहभाग घेतला. या लक्षवेधीच्या उत्तराप्रसंगी आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सांगितले, या रुग्णालयास प्रत्यक्ष भेट देऊन आरोग्य विभाग, राज्य व केंद्र कामगार विमा मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली असून रुग्णालय तातडीने सुरू करण्याबाबत अधिकाऱ्यानं सूचना दिल्या आहेत. या हॉस्पिटलमध्ये केवळ ईएसआयसीच नव्हे तर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा समावेश करण्यात येईल. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मोफत उपचार घेता येईल.

## अन्न सुरक्षा व तपासणीसाठी यंत्रणा अधिक सक्षम करणार : नरहरी झिरवाळ



**मुंबई :** राज्य शासनाने अन्न व औषध प्रशासनातील मनुष्यबळ वाढ, प्रयोगशाळा सक्षमीकरण, खासगी प्रयोगशाळा सहभागाची प्रक्रिया आणि ई-कॉमर्सवरील नियंत्रणाच्या दृष्टीने ठोस पावले उचलली आहेत. यामुळे राज्यातील अन्न सुरक्षेसंबंधी तपासणी यंत्रणा अधिक सक्षम व गतिमान होणार होईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली. या संदर्भात सदस्य श्वेता महाले यांनी लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य सर्वश्री विक्रम पाचपुते, प्रवीण दटके, मनोज घोरपडे, कृष्णा खोपडे, रमेश बोरनारे, मुरजी पटेल, नारायण कुचे, अनंत नर आणि श्रीमती मनीषा चौधरी यांनी सहभाग घेतला. मंत्री झिरवाळ यांनी सांगितले, अन्न औषध प्रशासन विभागात नुकतीच भरती करण्यात आली असून १८९ अधिकाऱ्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. नियुक्त अधिकाऱ्यांचे सध्या प्रशिक्षण सुरू आहे. राज्यात प्रत्येक विभागात एक स्वतंत्र प्रयोगशाळा असावी, असे शासनाचे धोरण असून प्रयोगशाळा सुविधांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## उद्याचा मेळावा ऐतिहासिक, मराठीला विजय मिळवून देणारा : संजय राऊत



**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन हिंदी विरोधात आवाज उठवला. त्यामुळे मराठीचा विजय शक्य झाला असल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. त्यामुळे उद्याच्या मेळाव्यासाठी आमचे नेते आणि मनसेचे नेते एकत्र तयारी करत असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले आहे. उद्याचा दिवस ऐतिहासिक असेल. त्यामुळे राजकारणात नवा बदल घडवणारा दिवस असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. हिंदीच्या विरोधात ठाकरेंनी मराठीला विजय मिळवून दिला, असा दावा देखील त्यांनी केला आहे. या मेळाव्या मुळे शिवसेना सोडून गेलेल्या जुन्या सहकाऱ्यांच्या पोटामध्ये भीतीचा गोळा उठला आहे. त्यामुळे नैराश्यातून त्यांची वायफळ वक्तव्ये समोर येत असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. रामदास कदम, एकनाथ शिंदे किंवा इतर शिंदे गटातील नेते काय बोलतात? हे सुरूच राहणार आहे. मराठी माणूस उद्धव आणि राज ठाकरे यांच्या निमित्ताने एकत्र आला असला तरी 5-25 टाळक्यांना ते एकत्र आलेले नको आहे. विशेष करून शिंदे गटाच्या लोकांचे राजकीय भविष्य संपणार आहे. या भीतीपोटी त्याना अशा कल्पना सुचत आहेत.

# सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग विभागाचे भारताच्या सकल उत्पन्नात योगदान

### केंद्रीयमंत्री जीतन राम मांझी यांची पत्रकार परिषदेत माहिती

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



भारत जगातील चौथी विकसित अर्थव्यवस्था आहे. भारताच्या सकल उत्पन्नात (जीडीपी) सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योगाचे (एमएसएमई) ३०.१ टक्के, उत्पादन क्षेत्राचे ३५.४ टक्के तर माल एक्सपोर्ट करण्यामध्ये ४५.७३ टक्के योगदान राहिले आहे. भारत २०२९ पर्यंत जगातील तिसरी अर्थव्यवस्था होण्यासाठी शेती क्षेत्रासोबत सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योगाचे महत्वपूर्ण योगदान राहणार आहे, अशी माहिती केंद्रीय सूक्ष्म, लघू, मध्यम मंत्री जीतन राम मांझी यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

केंद्रीयमंत्री मांझी यांनी सांगितले की, एमएसएमई विभाग मोठ्या उद्योगांच्या तुलनेत कमी गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना रोजगार देण्यात आणि उद्योजक बनविण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावत आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगार्तील नवउद्योजकांना प्रशिक्षण देवून बँक गॅरंटी देवून त्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याचे कामही करीत आहे. यावर्षी खादी ग्रामोद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण भागात प्रचार आणि विक्री करून एक कोटी ७० लाखांचा व्यवसाय केला आहे.

एमएसएमई विभागाद्वारे रोजगार देण्यात येणाऱ्या नवउद्योजकांची उद्यम पोर्टलद्वारे नोंदणी करून घेतली जात आहे. उद्यम असिस्टमध्ये त्यांना प्रशिक्षण, बँक कर्ज मिळवून देणे आणि व्यवसाय करण्यास मदत करण्यात येत आहे. आतापर्यंत देशातील ३४ करोड बेरोजगारांना रोजगार देण्याची प्रक्रिया एमएसएमई विभागाने केली आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे २२ करोड बेरोजगारांना रोजगार देण्याचे स्वप्न या एका विभागाने पूर्ण केल्याचेही मंत्री मांझी यांनी सांगितले.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतून छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्यांना मदत केली जाते. त्यांनाही एमएसएमई विभागामार्फत प्रशिक्षण देवून उद्योग उभारणीसाठी प्रथम १५ हजार रूपयांची मदत केली जाते. त्यांच्या कामाचे स्वरूप, कामाचा दर्जा आणि कामाची गुणवत्ता पाहून एक लाख ते ४ लाखांपर्यंत मदत केली जाते. स्थानिक पातळीवर उद्योग सुरू करून त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महिला आणि युवकांना आत्मनिर्भरतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री रोजगार गॅरंटी योजना शहरी आणि ग्रामीण भागात राबविली जात आहे. यातून उद्यम पोर्टलवर नोंद केलेल्यांना प्रशिक्षण देवून सबसिडीतून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. प्रधानमंत्री रोजगार गॅरंटी योजनेमध्ये आतापर्यंत ८०.३३ लाख रोजगार उपलब्ध झाले आहेत. यामध्ये ८० टक्के ग्रामीण भागात तर २० टक्के शहरी भागात रोजगार देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

महिला सक्षमीकरण आणि युवकांना आत्मनिर्भर करण्यासाठी एमएसएमई विभाग सातत्याने प्रयत्नशील असून प्रशिक्षणप्राप्त बेरोजगार युवकांना मोठ्या उद्योगांना क्रेडिट गॅरंटी योजनेंतर्गत पाच कोटी रूपयांपर्यंतची गॅरंटी घेतली जाते. यामुळे या उद्योगात नवउद्योजक मोठ्या प्रमाणात पुढे येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय एससी-एसटी हब ही एमएसएमई मंत्रालयाअंतर्गत चालणारी योजना आहे. एससी, एसटी समुदायातील उद्योजकांना उद्योजकतेसाठी सक्षम करणे, त्यांना सरकारच्या योजना, खरेदी धोरणे आणि बाजारात संधी मिळवून देण्याचे ध्येय आहे. त्यांना सरकारी योजना, आर्थिक मदत, कर्ज, प्रशिक्षण यांचा लाभ मिळवून देणे महत्वाचे आहे. याबरोबरच बाजारात मालाचा उठाव होत नसेल तेव्हा त्यांनी उत्पादित केलेल्या मालांची खरेदीही शासन करते. आतापर्यंत ३५०० कोटींचा माल शासनाने खरेदी केल्याचेही मंत्री मांझी यांनी सांगितले.

## प्रत्येक जिल्ह्यात सात टप्प्यात डिजिटल प्रत्यक्ष मतदान : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी पक्ष स्थापन केल्यापासून केवळ आदेशावर चालणाऱ्या शिवसेना पक्षात आता लोकशाही रुजवण्याचा प्रयत्न उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे करत आहेत. शिवसेनेतील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी आता पारदर्शक मतदान प्रक्रिया राबवण्याची घोषणा एकनाथ शिंदे यांनी केली आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांमध्ये सात टप्प्यात डिजिटल आणि प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेने निवडणूक होणार असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे मुख्य नेता या पदासाठी एकनाथ शिंदे हे देखील निवडणुकीला सामोरे जाणार आहेत. त्यामुळे त्यांना आता त्यांच्याच पक्षात आव्हान दिले जाते का? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

शिवसेना पक्षामध्ये आता या महिन्याच्या शेवटी अंतर्गत निवडणुका होणार आहेत. शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या झालेल्या बैठकीमध्ये एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केली आहे. पदाधिकाऱ्यांची नियुक्ती ही निवडणुकीच्या माध्यमातून केली जाणार आहे. त्यामुळे सक्रिय कार्यकर्त्यांना या निवडणुकीत सहभागी होता येणार असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. शिवसेनेच्या अंतर्गत निवडणूक मतदानातून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. तब्बल 22 वर्षानंतर शिवसेनेत अंतर्गत निवडणुका होत आहेत. विशेष म्हणजे मुख्य नेते या पदासाठी एकनाथ शिंदे यांना देखील निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात पक्षातच कोणी आव्हान देणार आहे का? याची चर्चा सध्या सुरू झाली आहे.

या निवडणूक प्रक्रियेमध्ये सात टप्प्यात ऑनलाईन आणि प्रत्यक्ष मतदानाद्वारे शिवसेना सदस्य हे पक्षाचे पदाधिकारी निवडणार आहेत. यामध्ये गटप्रमुख, शाखाप्रमुख, विभागप्रमुख, विभाग समन्वयक, जिल्हा संपर्कप्रमुख, जिल्हाप्रमुख, शिवसेना उपनेता, मुख्य नेता, लोकाधिकार समितीचे पदाधिकारी, महिला आघाडीचे पदाधिकारी देखील निवडले जाणार आहेत. शिवसेनेची पक्षांतर्गत निवडणूक प्रक्रिया महिनाअखेर प्रत्येक जिल्ह्यात होत आहे. 2003 नंतर प्रथमच घटनेनुसार पक्षांतर्गत निवडणूक होत आहे.

## वारीत बदलांचा सकारात्मक प्रभाव

### पालखी सोहळा प्रमुखांनी दिली माहिती

■ महासागर प्रतिनिधी,
सोलापूर, दि. ४ :



यंदाच्यावर्षी सर्वदूर चांगला पाऊस चांगला झाल्यामुळे सर्वत्र चैतन्यदायक वातावरण असून सोहळ्यामध्ये वारकऱ्यांची संख्या अधिक आहे. यावर्षी सोहळ्यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने काही बदल केले आहेत.

यावर्षी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाच्या दोन्ही चाकांच्या मध्ये जाळी बांधलेली आहे. त्यामुळे दर्शन घेत असताना, यापूर्वी काही छोटे अपघात घडले, ते यावेळी अत्तापर्यंत कुठेही घडले नाही. तसेच, पालखी रथामध्ये ठेवण्याची जागा थोडी खाली घेतली आहे, त्यामुळे रथ जात असताना पायी जाणाऱ्यांना सहज दर्शन घेता यावे, यासाठी तो बदल करण्यात आला आहे. पूर्वी रथातील पालखी, पादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना उडी मारुन घ्यावे लागत होते, त्यातून किरकोळ अपघात घडले होते. नवीन बदलांमुळे भाविकांना दर्शन घेणे सुखकर झाले आहे.

दररोज पहाटे, स्थानिक पोलिसांशी संवाद करून वाहतुकीच्या नियोजनासह, कुठे गर्दी होण्याची शक्यता असते, त्या ठिकाणच्या पयार्यी उपाययोजनांबाबत चर्चा करून त्याचे समन्वय करण्यात येते. महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएसचे) स्वयंसेवकांचे पाच पथक सोबत आहेत. त्यापैकी एक तुकडे पालखी रथाच्या सोबत पोलिसमित्र म्हणून काम पाहिते. एक तुकडी विसावा, एक जेवणाच्या ठिकाणी जाते व एक पाठीमागील दिंड्यासह, वाहनांचे नियंत्रण पोलिसांच्या मदतीने करत आहे. पालखी रथाच्या समवेत, वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे, आमच्या पर्यंत येणाऱ्या सूचना त्वरीत संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहचवतो, लगेच त्यावर मार्ग काढण्यात येतो. यंदाच्या सोहळ्यात वेळेच खूप अचूक नियोजन सुरु आहे. चोपदार मंडळी, स्वयंसेवक, पोलिसांच्या मदतीने ती यंत्रणा सुखकर पद्धतीने हाताळण्यात येत आहे.

दिंड्यामध्ये पडणारे अंतर कमी करण्यात येत आहे. त्यामुळे रात्री आठ, साडेआठ वाजता होणारी तळावरची आरती यावेळी सायंकाळी पाच ते साडेपाच वाजेपर्यंत होत आहे. व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून छोटं-छोटे बदल केले असल्याने त्याचा चांगला परिणाम यावेळी दिसत आहे.

दिंड्यांच्या मार्गावर स्पिकरला बंदी घालण्यात आली आहे. कारण, त्या आवाजामुळे दिंडीतील वारकऱ्यांना भजन करणाऱ्यांसाठी त्रास होतोय, त्यामुळे काही ठिकाणी सक्तीने बंदी केली, तर काही ठिकाणी आवाहनद्वारे स्पिकर्स बंद केले आहेत, त्यामुळे सर्वांना व्यवस्थित भजन करता येत आहे. तसेच, आम्हाला नियोजनासाठी संवाद करता येत आहे.

## पुण्याच्या दगडूशेठ गणपतीची मूर्ती सिंगापूरला रवाना

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ४ :



गणपती बाप्पा मोरया... च्या जयघोषात आणि पुण्याप्रमाणेच सातासमुद्रापार सार्वजनिक गणेशोत्सव अत्यंत भक्तीभावाने साजरा व्हावा, याउद्देशाने सिंगापूरला दगडूशेठ गणपती बाप्पा निघाले. दगडूशेठ गणपती बाप्पांची मूर्ती सिंगापूर मधील महाराष्ट्र मंडळ यांच्याकडे पाठविण्यात आली. यामुळे सिंगापूरमधील भारतीय समाजात महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक ठळकपणे प्रस्थापित होत असून, जगभरातील गणेशभक्तांचे आराध्य असलेल्या दगडूशेठ गणपती बाप्पांची मूर्ती सिंगापूरला येत असल्याने तेथील भारतीयांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने सिंगापूरमधील महाराष्ट्र मंडळ येथे पाठविण्यात येणा-या श्रीं च्या मूर्तीचे विधीवत पूजन मंदिरात करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, मूर्तीकार भालचंद्र उर्फ लाला देशमुख, राजाभाऊ घोडके आदी उपस्थित होते. श्रीं च्या मूतीर्ची उंची सव्वा तीन फूट असून पुण्यामध्ये ही मूर्ती सुभाषनगरमधील श्री नटराज आर्टचे भालचंद्र उर्फ लाला देशमुख व राजेंद्र देशमुख यांनी महिनाभरात साकारली आहे.

कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, सिंगापूरमधील मंडळासाठी तीन वर्षांपूर्वी मूर्ती दिलेली होती. मागील वर्षी मंडळाने या मूर्तीचे विसर्जन केले. त्यामुळे सर्व अलंकारांनी सजलेली बाप्पांची मूर्ती यंदा गणेशभक्तांसाठी पाठवत आहोत. महाराष्ट्र मंडळ सिंगापूर येथे गणेशोत्सव मोठया उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्ताने जगभरातील हिंदू बांधव एकत्र येतो आणि त्यांना गणपती बाप्पांचा आशिर्वाद प्राप्त होतो. बाप्पाची पूजा संपूर्ण जगभरात होते, त्यामुळे ट्रस्टच्या वतीने सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून ही मूर्ती पाठवत आहोत. सिंगापूर महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष अजेय कुलकर्णी म्हणाले, सिंगापूरमधील महाराष्ट्र मंडळ यंदाही सार्वजनिक गणेशोत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करणार आहे. सन १९९४ पासून नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था म्हणून कार्यरत असलेल्या या मंडळाचा उद्देश सिंगापूरमधील महाराष्ट्रीयन समाजात आपुलकी, सौहार्द, एकोपा आणि सांस्कृतिक जाणीवा वाढवणे हा असून, गेल्या तीन दशकांपासून मंडळ महाराष्ट्राची समृद्ध परंपरा विविध उपक्रमांद्वारे सातत्याने जपते आहे.

## जास्त बाम लावल्याने रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम : आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



डोक्याला जास्त बाम लावल्यामुळे रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम झाला, अशी तिखट टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांच्यावर टीका केली. त्यांच्या या टीकेमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेतून तीव्र प्रतिक्रिया येण्याची शक्यता आहे.

रामदास कदम यांनी नुकतीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती. उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांचा वेळोवेळी अवमान केल्याचा आरोप त्यांनी केला होता. पत्रकारांनी शुक्रवारी या प्रकरणी आदित्य ठाकरे यांना छेडले असता त्यांनी उपरोक्त शब्दांत टीका केली. जास्त बाम लावल्यामुळे डोक्यावर परिणाम होतो हे त्याचे उदाहरण आहे. त्या व्यक्तीचा निवडणुकीत दोनवेळा पराभव झाला. त्यानंतरही त्यांना विधान परिषदेवर संधी दिली गेली. मंत्रिपद देण्यात आले. पण त्यानंतरही ते पळून गेले. मी त्या व्यक्तीवर बोलू इच्छित नाही, असे ते म्हणाले.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी पाकिस्तानी हॉकी संघाला भारतात खेळण्याची संधी देण्यावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवरही निशाणा साधला.

## मद्यधुंद पोलिस उपनिरीक्षकाचे निलंबन

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ४ :

मद्यप्राशन करून कर्तव्यावर आलेल्या श्रेणी पोलिस उपनिरीक्षकावर लष्कर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, त्यांचे पोलिस खात्यातून निलंबन करण्यात आले आहे. संजय सुधाकर माटेकर असे निलंबीत करण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षकांचे नाव आहे. याबाबतचे आदेश वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिले आहेत. ते २९ जुलै रोजी रात्री एक वाजताच्या सुमारास ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह (डी.डी) कारवाईसाठी कर्तव्यावर होते. त्यांनी कारवाईसाठी एक चारचाकी गाडी थांबविली. गाडीतील तिघा व्यक्तींसोबत वाद घातला. हा प्रकार समोर आल्यानंतर माटेकर यांच्या विरुद्ध कर्तव्याच्या ठिकाणी मद्याचे सेवन केल्यामुळे लष्कर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'विद्यार्थ्यांना एसटी पास थेट शाळेत' योजनेद्वारे ५ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



राज्यातील काही भागात १६ जून पासून शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येत आहेत. केवळ १५ दिवसात म्हणजे १६ ते ३० जून या कालावधीत तब्बल ५ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थी - विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

सरनाईक म्हणाले, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जून पासून सुरू झाल्या. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. या अंतर्गत १ लाख ६१ हजार २०४ विद्यार्थ्यांना त्यांच्या, त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी पास वितरित केले. त्याचप्रमाणे शासनाच्या " पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर " योजनेंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. या अंतर्गत ३ लाख ६० हजार १५० विद्यार्थिनींना त्यांच्या शाळेत जाऊन पास वितरित करण्यात आले. यापुर्वी विद्यार्थ्यांना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. अथवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनकडून पास घेतले जात असत. आता विद्यार्थ्यांना पाससाठी रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा - महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्यांकडून त्या विद्यार्थ्यांना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येत आहेत. या संदर्भात १६ जूनपासुन एसटी प्रशासनातर्फे " एसटी पास थेट तुमच्या शाळेत " ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले होते. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होत आहे, अशी माहितीही मंत्री सरनाईक यांनी दिली.

जून पासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. लाखो विद्यार्थी एसटी बसेसने शाळेला जातात. त्यांच्यासाठी हजारो शालेय फेऱ्या एसटीने सुरू केलेल्या आहेत. परंतु विविध कारणांनी काही फेऱ्या अचानक रद्द केल्या जातात, अशा तक्रारी शालेय विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून येत आहेत. विशेषतः आदिवासी पाडे आणि दुर्गम भागातील शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना एकच बस फेरी उपलब्ध असल्याने. ती रद्द झाल्यास त्यांची प्रचंड गैरसोय होते. त्यामुळे यापुढे प्रत्येक आगार प्रमुखांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शालेय फेरी कोणत्याही परिस्थितीत रद्द होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिल्या आहेत.

## बोगस शिक्षक भरतीसंदर्भात विशेष चौकशी समिती नेमणार

### शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाह्य समावेश करुन वेतन अदा केले जात असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता मुख्यमंत्र्यांची मान्यता घेऊन अधिवेशन संपल्यानंतर एका महिन्यात आयएएस, आयपीएस, आणि न्याय व्यवस्थेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष चौकशी समिती नेमली जाईल. तसेच या समितीच्या चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर निश्चित कारवाई केली जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, एकनाथ खडसे, संदीप जोशी, डॉ.परिणय फुके, डॉ.मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, शिक्षकांची भरती प्रक्रिया ही नियमाप्रमाणेच होते. त्यास शासन नियमाप्रमाणेच मान्यता देते. तथापि भरतीमध्ये आर्थिक व्यवहार होऊन नियमबाह्य भरती झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर निश्चित कारवाई केली जाईल.

तसेच असे प्रकरण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी प्रलंबित ठेवले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर देखील कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी याबाबतच्या उपप्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

## ब्रम्हपुरी तालुक्यातील प्रकल्पांची पाहणी

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ४ जुलै :** जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज ब्रम्हपुरी तालुक्याचा दौरा करत विविध महत्वाच्या विकास प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये पावसाळ्यात अडथळा निर्माण करणाऱ्या पुलांचे अपूर्ण काम, आरोग्य सेवा केंद्र, सौर ऊर्जा व जलशुद्धीकरण प्रकल्पांचा समावेश होता. अड्याळ गावगन्ना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देत पावसाळ्यात पसरू शकणाऱ्या रोगांवर उपाययोजना करण्याचे आदेश तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना दिले.

## गुजरी आठवडी बाजाराचे शुल्क वाढ

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ४ जुलै :** नगर परिषद घुग्घुसने गुजरी व आठवडी बाजारासाठी नवीन शुल्क दरपत्रक जारी केले आहे. या दरानुसार विविध दुकानदार, फडवाले, हातगाडे, वाहन धारक व व्यवसायिक यांच्यावर दरश्रेणीनुसार शुल्क आकारण्यात येणार आहे. लघु व्यवसायांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सवलतीचे दर निश्चित करण्यात आले आहेत.स्थानिक व्यापारी प्रणयकुमार बंडी यांनी नगर परिषद मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात, हे नवीन शुल्क दर सर्व व्यापाऱ्यांना व नागरिकांना सुलभपणे उपलब्ध व्हावे यासाठी गुजरी व आठवडी बाजार परिसरात प्रमुख ठिकाणी शुल्क निर्धारण फलक लावण्याची विनंती केली आहे.

# अतिक्रमणाची माहिती देऊन मदत करणाऱ्या जागरुक नागरिकाचा नोटिस मध्ये उल्लेख

### कोरपना न.पं. मुख्याधिकाऱ्याची मुख्यमंत्री,आयुक्ताकडे तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै :** कोरपना येथील जागरुक नागरिकाने नगरपचायतीच्या मुख्याधिकारी यांच्याविरोधात थेट मुख्यमंत्र्यांना तक्रार केली आहे. अतिक्रमण हटवण्यासाठी दिलेल्या नोटीसमध्ये मुख्याधिकारी यांनी तक्रारदाराचे नाव उघड केल्यामुळे वैयक्तिक विरोध वाढवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मोहब्बत खान यांनी कोरपना येथील मुख्य बस स्टॉप चौकातून शहराकडे जाणारा मुख्य मार्गावर झालेल्या अतिक्रमण संदर्भात नगरपंचायतीकडे अतिक्रमण हटवण्याची तक्रार केली होती. या तक्रारीनंतर, मुख्याधिकारी येमाजी धुमाळ यांनी अतिक्रमणधारकांना नोटीस बजावली. मात्र, या नोटीसमध्ये तक्रारदाराचे नाव स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते, ज्यामुळे तक्रारदार संतप्त झाले आहेत.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, प्रशासकीय नियमांनुसार सार्वजनिक हितासाठी केलेल्या तक्रारींमध्ये तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवणे बंधनकारक असते. असे असताना, मुख्याधिकारी यांनी त्यांचे नाव उघड करून गोपनीयतेचा भंग केला आहे. यामुळे अतिक्रमणधारकांकडून त्यांना वैयक्तिक त्रास किंवा संभाव्य धोक्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या कृतीमुळे मुख्याधिकारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर केला असून, अतिक्रमणधारकांशी माझा वैयक्तिक संघर्ष वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर, तक्रारदाराने मुख्यमंत्री,नगर विकास मंत्री, आयुक्तासह जिल्हाधिकाऱ्यांकडे मुख्याधिकारी यांच्यावर तात्काळ सखोल चौकशी करून योग्य ती प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मुख्यमंत्री यांच्याकडून यावर काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या घटनेमुळे भविष्यात नागरिकांना सार्वजनिक हितासाठी तक्रार करण्यास प्रोत्साहन मिळेल की नाही, याबाबतही शंका उपस्थित केली जात आहे.

# बोगस शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची राज्यस्तरीय एसआयटी करणार चौकशी

### आमदार सुधाकर अडबाले यांचा प्रश्न : शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांची माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै :** नागपूर विभागातील शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळ्याने राज्यात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती नागपूर विभागासह संपूर्ण राज्यात आहे. त्यामुळे राज्यातील बोगस शिक्षक पदभरती / शालार्थ आयडी प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत करावा. यात गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी शुक्रवार (ता. ४) विधानपरिषदेत तारांकित प्रश्नाद्वारे केली. या प्रकरणाची प्रशासकीय, पोलिस विभागामार्फत चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती बघता राज्यस्तरीय एसआयटी नियुक्त करून यात आयएएस, आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांसह न्यायालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येणार असल्याचे शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तर देतांना सांगितले.

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात अराजकता माजली आहे. शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळा नागपूर या उपराजधानीत उघडकीस आला आहे. या घोटाळ्याची पाळेमुळे राज्यभर पसरली आहेत. २ मे २०१२ पासून शिक्षक पदभरती बंद करण्यात आली. फेब्रुवारी २०१३ ला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी २०१३ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या डीएड धारकांच्या नियुक्तीस मृत शिक्षणाधिकारीच्या स्वाक्षरीने मान्यता देण्यात आली. २०१९ नंतर या पदभरतीस बोगस शालार्थ आयडी मिळविण्यात आला. यातून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीची लूट करण्यात आली.

# आ.सुधीर मुनगंटीवार खत वितरणातील गैरप्रकारांविरोधात उद्या देणार तक्रार !

### शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी आ. मुनगंटीवार यांचा ठाम पवित्रा

### कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड विरूद्ध बल्लारपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै :** शेतकऱ्यांना रासायनिक खत पुरवठा करताना जबरदस्तीने इतर वस्तू विकत घेण्यास भाग पाडणाऱ्या खत पुरवठाधारकाविरोधात आता कायदेशीर लढा उभारण्यात येणार आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार हे उद्या, शनिवार, दिनांक ५ जुलै २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता बल्लारपूर पोलीस ठाण्यात या प्रकरणी अधिकृत तक्रार दाखल करणार आहेत.



शेतीसाठी अत्यावश्यक असलेले रासायनिक खत कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड नामांकित कंपनीकडून वितरित केले जाते. मात्र, या खतांच्या वितरणासोबत अन्य वस्तूंची 'लिंकिंग' करून चिल्लर विक्रेत्यांवर जबरदस्ती केली जाते. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसतो, कारण त्यांना ही अनावश्यक उत्पादने खरेदी करूनच खत मिळते. परिणामी, शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाची स्थिती निर्माण होते.

या प्रकारांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता, आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या लूटप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. 'शेतकऱ्यांच्या हितासाठी कुठलाही अन्याय सहन केला जाणार नाही,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणीही अधिकृत तक्रार देऊन उद्या करणार आहेत.

# मार्गावरील खड्ड्यांना नाल्याचे स्वरूप, संबंधित विभागाचे दुर्लक्ष!



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ४ जुलै :** तालुक्यातील कान्हाळगाव ते मांडवा या मार्गाची दुरवस्था झाली आहे सततच्या वाहणाऱ्या पाण्यामुळे रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्याने पाणी आणि मोठे खड्या खड्या त्यामुळे रस्त्या रस्त्याला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. परिणामी या मार्गावरील ये -जा करणाऱ्या वाहनधारकांना आणि नागरिकांना ना त्रास सहन करावा लागत आहे याकडे संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी होत आहे या ठिकाणी कायमस्वरूपी पाणी वाहत असल्याने माती साचून रस्ता परिवर्तन झाला आहे. रस्त्यावर खोल खड्डे तयार झाल्याने वाहनाचे नियंत्रण सुटून अपघात होण्याची होण्याचा धोका सतत निर्माण झाला आहे काही दिवसापूर्वी दुसऱ्या रस्त्यावरून घसरून जखमी झाल्याची घटना घडली आहे या समस्याचे निराकरण करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे रस्त्यावर पाइप टाकून मोठा असा रपटा( बांधकाम) करून पाण्याची योग्य निसार करण्याची मागणी केली आहे परंतु कोणती ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. या मार्गाचा वापर शाळेकरी विद्यार्थी शेतकरी आणि रोजंदारी करणारे नागरिक मोठ्या प्रमाणात करत आहे तरीही संबंधित विभाग कोणतेही ठोस पाऊल उचलली जात नसल्यामुळे ग्रामस्थ व वाहनधारकास त्रास आहे. प्रशासनाने लवकरात लवकर या समस्या कडे लक्ष देऊन सादर मार्ग त्वरित दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांसह युवासेनेचे उपतालुकाप्रमुख नितेश महागोकार यांनी केली आहे .

# माजी विद्यार्थ्यांकडून साजरा केला मुख्याध्यापक संम्बामुर्ती याच्या ७७ वा वाढदिवस



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. ४ जुलै :** घुग्घुस येथील अंदाजे ३ किलोमीटर अंतरावर नकोडा येथील तेलुगु शाळेतील माजी मुख्याध्यापक संम्बामूर्ती यांच्या ७७ वा वाढदिवस माजी विद्यार्थ्याद्वारे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम माजी विद्यार्थ्यांनी माजी मुख्याध्यापक संम्बामूर्ती सरांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आले.तसेच समोर वाटचालीस अभिनंदन करण्यात आले.

घुग्घुसच्या वृद्धाश्रम येथे त्याच्या केक कापण्यात आले.तसेच वृद्धाश्रमात फळ वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक सैय्यद सलीम सरकार,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष (अजित पवार गट)श्रीनिवास गोसकुला,मुन्नुरुकापू समाज जिल्हा महासचिव शंकर सिद्धम, मरियम्मा बहुउद्देशीय संस्था चिंतल्ला चन्द्रय्या, रवि चिट्टाला व माजी विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# घुग्घूस काँग्रेस कमिटी तर्फे दिवंगत खा. बाळू धानोरकर यांची जयंती साजरी

### नवी दिशा वृद्धाश्रमात फळ वाटप करीत साजरी केली जयंती

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ४ जुलै :** चंद्रपूर - वणी - आर्णी लोकसभा क्षेत्रातील दिवंगत लोकप्रिय खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांच्या जयंती निमित्त काँग्रेस शहर अध्यक्ष राजुरेड्डी याच्या मार्गदर्शनाखाली नवी दिशा वृद्धाश्रमात बाळू धानोरकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून तसेच प्रार्थना करून आदरांजली अर्पित करण्यात आली.

तसेच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना फळ वाटप करण्यात आले.

यावेळी काँग्रेस नेते सैय्यद अनवर, जिल्हा सचिव अजय उपाध्ये, सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष रोशन दंतलवार,एस्सी सेल तालुकाध्यक्ष राजकुमार वर्मा, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास गुडला, विजय माटला,



सुनील पाटील, दिपक कांबळे, कपिल गोगला, कुमार रुद्रारप, अंकुश सपाटे, दिपक पेंदोर, अरविंद चहांदे, गणपत लभाने व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# नागभीड बसस्थानक स्वच्छता गृहाची दुरावस्था, प्रवाशांचे हाल

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ४ जुलै :** नागभीड येथे नव्याने बस स्थानकाची उभारणी कासव गतीने सुरू असल्याने गेल्या काही वर्षापासून प्रवाश्यांना ऊन वारा, पाऊसाचा सामना करताना शेजारील चहा, पान टपऱ्याचा आधार घेत प्रवाश्यांना उघड्यावर उभे राहतात. त्याच्याच सेवेसाठी गेल्या काही वर्षापूर्वी स्वच्छता गृहाची सोय केली होती मात्र नव्याने उभारण्यात येत असलेल्या बस स्थानकामुळे जुन्या



स्वच्छतागृहाकडे दुर्लक्ष केले जात असल्याने प्रवाश्यांना उघड्यावर लघु शंका करावी लागते मात्र याचा फटका महिलाना बसत आहे याकडे परिवहन व नगर परिषदेने लक्ष द्यावे अशी मागणी प्रवासी संघटनांनी केली आहे यावर काय उपाय केले जातात याकडे प्रवाशाचे आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मोहरम निमित विविध कार्यक्रमाचे आयोजन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ४ जुलै :** दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा मोहरम बहुउद्देशीय उत्सव समिती ( सर्वधर्म समभाव ) तर्फे मोहरम निमित दि ६ जुलै ला सायंकाळी गांधी चौक भद्रावती येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . या परिसरात संपूर्ण विद्युत रोशनाई, पताका,स्वागत गेट,ढोल ताशेनी सजावट करण्यात येते . यात अनेक जाती धर्माचे लोक सहभागी दर्शवित

अनेक सामाजिक संघटने मार्फत शरबत - लंगर - मिठाई - प्रसाद - वितरण केल्या जाते. व्यापारी असोशियन, आटो असोशियन, भद्रावती पत्रकार असोशियन व सामाजिक संघटनाचा सहभाग राहत असतो.

शहरातून प्रत्येक वार्डातून सवाऱ्या ,ख्वाज्या, ताजे,पंजे गांधी चौकात एकत्र येऊन भेटीगाठी घेतात. गेल्या २० वर्षांपासून सदभावना,भाईचारा, कौमी एकता ,देशभक्ती ,शांतता कायम ठेवण्याचे कार्यक्रम समिती मार्फत होत असते.

मोहरमच्या ७ वि ला व मोहरमच्या ९ वि ला रात्रौ सवाऱ्या व ख्वाज्या हे प्रत्येक दरग्यावर भेटीगाठी घेत असतात आणि मोहरमच्या १० वि ला मोहरमची सांगता गांधी चौक येथे होते.



या सदर कार्यक्रमाकरिता उपस्थित राहण्याचे आवाहन उमेश रामटेके माजी नगरसेवक, समितीचे अध्यक्ष राजू गैनवार, समितीचे सचिव अनिल धानोरकर माजी नगराध्यक्ष, समितीचे उपाध्यक्ष रब्बानी शेख , संघटक निलेश पाटील, कार्याध्यक्ष प्रफुल चटकी, सागर जट्टलवार, प्रशांत बदखल, जगन दानव, सुनील नामोजवार,दिलीप ठेंगे, दिलीप मांढरे,विनायक येसेकर,खेमचंद हरीयानी,विलास गुंडावार,बाळू उपलंचीवार, संजय बॅनर्जी यांनी केले आहे.

# सामाजिक दायित्व जपनारे सेवा कलश फाऊंडेशन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ४ जुलै :** आपण ज्या समाजात, परिसरात राहतो त्या समाजासाठी, येथील नागरिकांसाठी काही तरी करण्याची तडमड, आत्मियता मनात बाळगून सेवा कलश फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेची पायाभरणी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत धोटे यांनी केली.



राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यात सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, महिला व बालकल्याण अशा मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात रचनात्मक कार्य करण्यास प्रारंभ केला. आणि बघता बघता सामाजिक दायित्वातून सेवाकार्य करणे, गोरगरीब गरजवंतांची मदत करणे अशा विधायक कार्यासाठी कटिबद्ध असलेली संस्था म्हणून अल्पावधीतच ही संस्था नावारूपाला सुद्धा आली.

संस्थेच्या माध्यमातून राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील असंख्य कुपोषित बालकांना पोषण आहार साहित्य किट भेट देऊन त्यांना कुपोषणमुक्त करून सुदृढ आरोग्य बहाल करण्यास मदत करण्यात येते. कुपोषणमुक्त समाज निर्माण कार्यसाठी संस्था प्रामुख्याने सेवा कार्य करीत आहे.

महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावरील अतिदुर्गम व आदिवासी बहुल जिवती तालुक्यातील पाटण, शेणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन अभिजीत धोटे यांनी परिसरातील नागरिकांच्या आरोग्याची विशेषतः क्षयरोगाचे रूग्ण या विषयी माहिती जाणून घेतली आणि एक हात मदतीचा म्हणून क्षय रोग पीडित रुग्णांना सकस आहार देण्याचा संकल्प घेतला. यानुसार क्षयरोग रुग्णांना सकस आहार किटचे वितरण करण्यात येते. परिसरातील इयत्ता दहावी, बारावी मध्ये उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार सोहळे आयोजित करून त्यांच्या यशाचे कौतुक करणे, करिअर निवड, व्यक्तिमत्त्व विकास अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी सुद्धा सेवा कलश फाऊंडेशन हिरिरीने पुढाकार घेत असते. प्रत्येक गुणवंतांचा सन्मानचिन्हे, शैक्षणिक उपयुक्त भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात येतो. एवढेच नव्हे तर गोरगरीब, गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणात मदत करण्यासाठी सुद्धा संस्थेचा पुढाकार असतो. आजपर्यंत अनेक होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य भेट, वस्तीगृहासाठी मदत तसेच इतर अनेक प्रकारे मदत सेवा कलश फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

दरवर्षी संस्थेच्या वतीने कबड्डी, व्हालीबाल, क्रिकेट अशा स्थानिक ते राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. ज्यातून स्थानिक खेळाडूंना आणि त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा पुरेपुर प्रयत्न करण्यात येतो. विशेषतः कबड्डी सारख्या मातीशी निगडित खेळावर भर देऊन स्थानिक युवक व युवतींना राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचे कौशल्य दाखवून प्रोत्साहन देण्यात येते.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जीथे जीथे आवश्यकता आहे तीथे एक हात मदतीचा पुढे करून परिसरातील गोरगरीब, गरजवंत नागरिकांना मदत करण्यासाठी सेवा कलश फाऊंडेशन कटिबद्ध असून येणाऱ्या काळातही हे सेवा कार्य अविरत सुरू राहणार आहे.

# ६ जुलै ला राजर्षी छत्रपती शाहूजी महाराज जयंती

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै :** पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) तर्फे रविवार, ६ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता श्रमिक पत्रकार भवन वरोरा नाका येथे राजर्षी छत्रपती शाहूजी महाराज जयंती चे आयेजन केले असल्याची माहीती हरीश सहारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




हरीश सहारे यांच्या अध्यक्षतेखाली दहावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांची बैठक आणि जनसंकल्प बैठक आयोजित केली जाईल. यावेळी संभाजी ब्रिगेडच्या माजी जिल्हाध्यक्षा वनिता आसुटकर, जी.के. उपरे, संदीप रामटेके, सूर्यकांत खनके, माजी प्राचार्य, मातोश्री उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालय चंद्रपूर, संदीप वाघमारे, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य, युवा शाखा, पी.पी.आय. (डे), मोतीराम करमणकर, राज्य कार्यकारिणी सदस्य, एमकेकेएम इत्यादी कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी मराठा, कुणबी आणि इतर मागासवर्गीयांना ५०टक्के आरक्षण देण्यासाठी अध्यादेश काढला. राजर्षी छत्रपती शाहूजी महाराजांची जयंती साजरी करून आणि ५०० रॅली आयोजित केल्यानंतर जाहीर सभा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समारोपीय राष्ट्रीय रॅली आणि जाहीर सभा २६ जुलै २०२५ रोजी बिहारमधील पाटणा येथे होणार आहे. शहरातील नागरिकांना आयोजित शाहू महाराज जयंती कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## कोर्ट विद्यमान तहसिलदार चिमूर यांचे कार्यालय

**रा.मा.क्र. /कुळ वहिवाट/ २०२२-२३** **मौजा :मदनागड रिठ**

### जाहीरनामा

मौजा मदनागड रिठ येथील ६ आराजी ०.५० हे.आर. या शेतजमिनीचे तलाठी ७/१२ वर असलेले 'गणपत देवाजी लक्ष्मण' या नावाचे कुळ खारीज करून मिळण्याबाबत श्री. रविंद्र व मधुकर लक्ष्मण मासुरकर रा.चिमूर यांनी अर्ज सादर केल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

याद्वारे जाहीर करण्यात येते कि, उक्त जमिनीत ज्यांचे हितसंबंध असतील किवा ज्यांना अशी परवानगी मंजूर करण्याविरुध्द कोणतेही आक्षेप सादर करावयाचे असतील तर त्यांनी दि.०७.०८.२०२३ पर्यत अशा सर्वाना याद्वारे कळविण्यात येते कि, एक तर त्यांनी स्वतः जातीने किवा विधी व्यवसायी किवा अभिकर्ता यांचे मार्फत उक्त तारखेस माझे समोर उपस्थित राहावे किवा कोणतेही आक्षेप असल्यास ते त्यांनी माझे विचारासाठी निवेदन लिखित स्वरुपात सादर करावेत. माझे सही शिक्यानिशी देण्यात आली.

स्थळ :- चिमूर

दिनांक:-२५.०७.२०२३

**स्वा/ -**
**तहसिलदार, चिमूर**

नाशिकचे बबनराव घोलप या माजी मंत्र्यापासून पक्षांतरासाठी सुरू झालेला पळापळीचा प्रवास माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांच्यापर्यंत येऊन पोहोचला. या दोघांच्या मध्ये अनेक माजी नगरसेवक किंवा विधानसभेसाठी इच्छूक तसेच पडलेले उमेदवार यांचाही समावेश झाला. सरकारी पक्षांमध्ये सहभागी होण्यासाठी झालेली पळापळ पाहून जनतेचे चांगलेच मनोरंजन झाले. यातील काही नेत्यांचे प्रवेश हे फक्त चौकशा थांबण्यासाठी, तर काहींना सत्तेचा मलिदा पाहिजे म्हणून त्यांनी प्रवेश केले. अपूर्व हिरेंविरोधात त्यांच्याच शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्याने पक्षप्रवेशाच्या तोंडावर गुन्हा दाखल केल्यावर त्यांना आता भाजपच मदत करू शकेल. तर अनेक ठेकेदारांचा सरकारी पक्षांमधील प्रवेश हा फक्त पोटापाण्यासाठी असतो. त्यातच भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी 'जो येईल त्याला घ्या' हा नारा दिल्यामुळे स्थानिक आमदार हतबल झाल्याचे चित्र जिल्ह्याने पाहिले. कोणत्याही परिस्थितीत नाशिक महानगरपालिका ताब्यात घ्यायचीच, असा निश्चय भाजपसह महायुतीकडून झालेला दिसतो. मोठ्या प्रमाणावर माजी मंत्री, माजी आमदार, माजी नगरसेवकांचे प्रवेश झाले असले, तरी यातील अनेकांचे राजकारण संपण्याच्या उंबरठ्यावर उभे आहे. परंतु शेवटपर्यंत धडपड करण्याचे त्यांचे प्रयोग सुरू आहेत. विद्यमान आमदारांना शह देण्यासाठी काही तगड्या राजकारण्यांना भारतीय जनता पक्षातूनच बळ देण्यात आल्याचे भाजपच्या नाराज नेत्यांचे म्हणणे आहे. भाजपला ओव्हरटेक करून शिंदे सेनेचा सध्या तरी बोलबाला दिसत आहे. अजित पवार गट सध्या 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत आहे. नगरसेवकांच्या प्रवेशाची चर्चा गेली महिनाभर जोरात सुरू होती. त्या सर्वांची गाडी आता प्लॅटफॉर्मवर लागली आहे. तसे पाहता आज पर्यंत एक प्रभाग एक नगरसेवक ही संकल्पना होती तोपर्यंत अशांचे फावले. कारण एखादी गल्ली, एखादा बोळ, पॅक करून ग्रामीण भागातील पै पाहुण्यांच्या बोगस नावाचा आपल्या प्रभागात अंतर्भाव करून शंभर दीडशे मतं मिळवायची व काही गरीब मतदारांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन त्यांची मते विकत घ्यायची आणि निवडून यायचे, हा आतापर्यंतचा पायंडा होता. सध्या जे काही पक्षप्रवेश होत आहे त्याचा पाया नाशिक महापालिका आहे. शहरातील काही चेहरे वारंवार निवडून येताना दिसतात. परंतु आता काळ बदलला आहे, याची जाणीव पक्षनेत्यांना आलेली दिसत नाही. चार प्रभागांचा एक वार्ड झाला आहे. त्यामुळे अशा लोकांचा जनता निश्चितपणाने बंदोबस्त करेल अशी चर्चा सध्या जोर धरू लागली आहे. नाशिक महापालिकेचे नेतृत्व ज्यांनी ज्यांनी आजपर्यंत केले, त्यांनी देखील अशाच कारभाऱ्यांकडे शहराची सूत्रे देऊन पूर्णतः शहराचा बट्ट्याबोळ केला आहे. यातील काही माजी महापौरांना जनतेने यापूर्वीच दणका दिला आहे. परंतु त्यांची अजूनही हौस फीटलेली नाही. त्यामुळे पक्ष बदलून तरी पुन्हा महापालिकेत जाता येईल का? याचे प्रयोग सुरू झाले आहेत.



# पळा पळा कोण पुढे पळते ते पाहू!

संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र सध्या आयाराम गयाराम संस्कृतीने व्यापले गेले आहे. कोण कोणत्या पक्षात होते आणि कोणत्या पक्षात आले याचा लवकर थांगपत्ताच लागत नाही.

ज्या कुटुंबाला काँग्रेसने भरभरून दिले होते, त्या सर्वांनी काँग्रेसच्या घराला लागलेली घरघर पाहून राम राम ठोकला व भाजप सह शिंदेंची शिवसेना व अजितदादांच्या राष्ट्रवादीला जवळ केले. साधे उदाहरण घ्यायचे ठरले, तर ज्यांच्या घराण्याची तीन पिढ्यांची सत्तेची वाटचाल काँग्रेसमध्ये गेली, त्या धुळ्याचे कुणाल पाटीलही नुकतेच भाजपवासी झाले.

सध्याचा काळ हा काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्या दृष्टिकोनातून कठीण आहे. अर्थात भविष्यात चांगले दिवस आल्यानंतर कदाचित भाजपमध्ये किंवा अन्य पक्षात गेलेले परतही येतील, तसा त्यांचा पूर्वीचा इतिहास आहे.

पूर्वी काँग्रेसमध्ये देखील अशीच अवस्था होती. पक्षाचे वरिष्ठ नेते खालील नेत्यांना व कार्यकर्त्यांना किंमत देत नव्हते. आज तशीच अवस्था भाजपची व शिवसेनेची झाली आहे. देशात कितीही बेरोजगारी आणि महागाई वाढली तरी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा अशी तयार झाली आहे की, भाजपला किंवा त्यांना पर्यायच तयार झालेला नाही. राहुल गांधी हा मोदींना समर्थ पर्याय नसल्याचे लोकांच्या मनात ठासून भरले आहे. त्यामुळे भाजपची लोकप्रियता जशीच्या तशीच आहे. याला कारण काँग्रेस पक्ष जवळपास मोडीत निघाल्याचे चित्र देशभर स्पष्ट झाले आहे.

गलीतगात्र काँग्रेसची जागा घेण्यासाठी आता प्रादेशिक पक्ष पुढे येत आहे. काँग्रेस आणि गांधी घराण्याविषयीचे प्रेम असल्याची पिढी संपली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल कमालीचा आदर व प्रेम असलेले शिवसैनिक आजही आहे. परंतु त्यांच्या काळातील शिवसेना आता दिसत नाही. कारण शिवसेनाच दोन गटात विभागली गेली आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

हिंदुत्ववादी पक्ष म्हणून ओळख असणारे पक्ष दोनच आहेत. सेनेला फोडणे, बदनाम करणे, विस्कळीत करणे आणि शक्तिपात घडवून आणणे भाजपला अनिवार्य आहे. पहिल्या युतीचा उद्देश तेव्हापासूनच तो होता, आता तो मूर्त स्वरुपात दिसायला लागलेला आहे. हिंदुत्वाचा ब्रँड आणि मतपेढी फक्त आपल्या खिशात पाहिजे यासाठी ही सगळी धडपड. निवडणुकीत सगळ्याच बाबींच व्यवस्थापन करायला स्थानिक सत्ता हातात असणे गरजेचे आहे.

ज्योतिरादित्य शिंदे, बबनराव पाचपुते, स्नेहलता कोल्हे, राधाकृष्ण विखे, हर्षवर्धन पाटील, नारायण राणे कुणालाही विचारा. आपल्यामागे ईडी नाहीये हाच त्यांच्यासाठी मोठा बहुमान आहे.

आपण राजकारणात आहोत एवढच समाधान यापुढे बंडकरी मंडळीना राहील. त्यामुळे नाशिक मधील नगरसेवकांची पळवा पळवी सुरू झाली आहे. जिथे सरकारच विकत घेतले जाते, तेथे नगरसेवक किस झाड की पत्ती. पळा पळा कोण पुढे पळते ते पाहू, याप्रमाणे सध्या नगरसेवकांची घाऊक खरेदी विक्री जोरात सुरू झालेली आहे.

जिथे अख्खे सरकारच विकत घेतले जाते, तेथे त्यांना नगरसेवक हे कस्पटा समानच वाटत असतील. सध्या महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजणार असे काहीसे वातावरण आहे. अशावेळी आपल्या पक्षांमध्ये माजी नगरसेवक असावेत असे पक्ष नेतृत्वाला वाटणे गैर नाही. परंतु, सध्या ज्यांची बोली जास्त त्यांच्याकडे नगरसेवकांचा ओढा जास्त असे चित्र नाशिकमध्ये पाहायला मिळत आहे.

प्रत्येक नेत्याकडे असे एक दोन कारभारी आहेत की, ज्यांनी महापालिका ही आपली खाजगी प्रॉपर्टी समजूनच कारभार केला आहे आणि नाशिक शहराचे वाट्टोळे केले. काहींनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून बिल्डरांच्या दावणीला महापालिका बांधली आणि स्वतःच्या तुंबड्या भरून नेत्याला सोडून दुसरा नेत्याबरोबर घरोबा करायला मागेपुढे पाहिले नाही.

हे कारभारी म्हणजे नेत्यांची 'असून खोळंबा आणि नसून अडचण' झाली आहे आणि 'धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळते' अशा कात्रीत नेते स्वतःच्याच चुकीमुळे अडकले आहेत. बबनराव घोलप, सुधाकर बडगुजर, विलास शिंदे, अपूर्व हिरे, गणेश गीते, अशोक मुर्तडक अशा प्रमुख लोकांनी आपापले पक्ष सोडले. त्यांच्याबरोबर अनेक माजी नगरसेवकांनी पक्ष सोडले असले, तरी त्यांची विशेष दखल घेण्यात आली नाही.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सुधाकर बडगुजर, विलास शिंदे आणि गणेश गीते यांचे पक्षप्रवेश हा त्यांच्या पक्षाला मिळालेला मोठा दणका समजायला हरकत नाही. कारण कितीही नाही म्हटले तरी आपापल्या प्रभागात त्यांची एक विशिष्ट ताकद आहे. याशिवाय ज्या पक्षांमध्ये त्यांनी प्रवेश केला, तेथेही त्यांचे 'गॉडफादर' कायम त्यांच्या पाठीशी उभे राहिलेले नाशिकच्या जनतेने पाहिले आहे.

एक मात्र निश्चित की, नाशिकचे जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी सीमा हिरे, देवयानी फरांदे, राहुल ढिकले यांचे मत काय आहे, याबाबत कधीही पक्षाने दखल घेतली नाही. जे काही निर्णय घ्यायचे आहे ते गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे या राज्यस्तरीय नेत्यांनी घेऊन टाकले. परंतु त्यामुळे नाशिकमध्ये खाली काय चालले आहे, याकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही. येथून पुढे पक्षाच्या विरोधात लढाया करायच्या व पुन्हा पक्षात येण्याचे मार्ग मोकळे असतात, ही माहिती कार्यकर्त्यांना झाल्यामुळे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत प्रचंड बंडाळी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

●●●●●●●

## बबनरावांचे पक्ष सोडण्याचे हास्यास्पद कारण

महायुतीतील तीन पैकी कोणत्याही पक्षात प्रवेश करायचा असेल, तर प्रत्येकाची काही ना काही कारणे ठरलेली असतात. अपवाद वगळता एकही कारण खरं नसतं. काहींना तर कारणही नसते. फक्त सत्तेची जवळीक असावी लागते. अलीकडच्या काळात तर फक्त आपल्यामागे लागलेलाच चौकशीचा ससेमिरा थांबावा हेच खरे एकमेव कारण आहे. परंतु त्यातही अनेक नेत्यांची कारणे इतकी हास्यस्पद आहे की, ते ऐकून अनेकांचे मनोरंजन झाले. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून माजी मंत्री बबनराव घोलप यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. विधानसभा निवडणुकीत मुलगा योगेश यांचा पराभव झाल्यावर बबनरावांना तिथे थांबण्यात रस नव्हता. परंतु पुन्हा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जायचे म्हणजे काहीतरी कारण असायला हवेत ना! मग त्यांना अफलातून कारण सापडले ते असे की, माजी नगरसेवक सुधाकर बडगुजर यांचा ठाकरेंच्या शिवसेनेने अपमान केला म्हणून मी पक्ष सोडला. जे कारण बडगुजर यांनी देखील सांगितले नाही ते कारण बबनरावांनी सांगितल्यावर शिवसेनेतीलच लोकं हसू लागले. पण खरं कारण म्हणजे बबनराव घोलपांना एका केसमुळे निवडणूक लढविता येत नव्हती. मुलाचा विधानसभा निवडणुकीत दोनदा पराभव झाला. दोन्ही मुलींचा महापालिका क्षेत्रात पराभव झाला. त्यात माजी महापौर असलेल्या मुलीचाही पराभव झाला. ठाकरेंच्या शिवसेनेत चोहोबाजूने त्यांच्या माथी पराभवच येत राहिले. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेत 'राम' राहिला नाही, असे त्यांना वाटत असावे व हेच खरे कारण आहे!

## डॉ. अपूर्व हिरेंचे राज्यातील सर्व पक्षात प्रवेश झाले

अनेकांना सत्तेशिवाय करमत नाही. परंतु माजी आमदार अपूर्व हिरे यांना मात्र दादा भुसे या तगड्या प्रतिस्पर्ध्याने चांगलेच अडकून ठेवले आहे. परंतु त्यांच्या राजकारणाचा अलीकडचा पोतच बिघडलेला दिसतो. मुळात दीर्घकाळ काँग्रेसची सत्ता असताना ते काँग्रेस बरोबरच होते व सत्तेतही होते. कालांतराने त्यांनी स्वतःचाच पक्ष काढला. काही काळ त्या पक्षात काढून शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेतून राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी दुभंगल्यानंतर तळ्यात मळ्यात करीत अखेर अजितदादा बरोबर गेले. तेथे चार सहा महिने काढल्यानंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.

या संपूर्ण घडामोडीत त्यांचा सत्तेला स्पर्शच होईना. शेवटी विधान परिषद कशीबशी ताब्यात आली. पण तेथेही ते रमेना. दुसऱ्या बाजूला त्यांच्या शिक्षण संस्थेच्या मागे मंत्री दादा भुसे हात धुवून लागले होते. तो ससेमिरा टाळायचा असेल, तर आपल्याला भारतीय जनता पक्षाशिवाय दुसरा पर्याय नाही हे त्यांच्या लक्षात आले. परंतु स्थानिक ठिकाणाहून कुठलेही सहकार्य नसल्यामुळे यापूर्वीच्या आपल्या संबंधातून थेट दिल्लीहून जगत प्रसाद नड्डा यांच्या माध्यमातून राज्यातील नेत्यांशी संपर्क करून अखेर भाजपमध्ये दुस?यांदा प्रवेश केला. सध्या सरकार महायुतीचे असल्यामुळे ते लवकर आता हा पक्ष सोडणार नाही. पण कदाचित भविष्यात भाजप सत्तेवरून दूर जाताच, पुढची वाट त्यांची तयारच असते, असे त्यांचेच समर्थक खुलेआमपणे बोलतात. पण या निमित्ताने एखादा अपवाद वगळता राज्यातील सर्वच पक्षांमध्ये त्यांचे प्रवेश होऊन गेले!

# हिंदू : ५० वर्षानंतर कसा असेल?

माहेश्वरी समाज : घटती लोकसंख्या,समस्या व उपाय... हा अत्यंत अभ्यासपूर्ण, चिंतनशील लेख नुकताच माज्या वाचनात आला. लेखकाने अतिशय संशोधन करून, विविध आकडेवारी देऊन हा लेख लिहिलेला असल्यामुळे लेखाचे गांभीर्य लक्षात येते.

माहेश्वरी समाज हा प्रामुख्याने उद्योग, व्यवसाय करणारा, आर्थिकदृष्ट्या सक्षम, शांतताप्रिय समाज म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या समाजाची लोकसंख्या कमी होत चालली आहे, ही केवळ त्या समाजाचीच समस्या नसून ती राष्ट्रीय समस्या म्हणून पाहिली पाहिजे. या समस्येवर उत्तरे शोधण्यासाठी सामाजिक स्तरावर विचार मंथन आणि उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू आहेत,ही स्वागतार्ह बाब आहे.

खरं म्हणजे लग्न उशीरा करणे, किंवा लग्नच न करणे, केलेच तर करिअर आणि किंवा अन्य कारणांमुळे मूल होऊ न देणे अशा स्वरूपाच्या समस्या हिंदू धर्माच्या अन्य समाजांना देखील भेडसावत आहेत. या प्रकरणी हिंदू धर्माच्या देश विदेशातील धुरिणांनी,सर्व संघटनांनी, भारत सरकारने सुद्धा लक्ष घालणं आवश्यक असून, या बाबतीत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा काय उपाय योजना करता येऊ शकतील याचा विचार केला पाहिजे.

देवेंद्र भुजबळ
९८६९४८४८००

आज जगात युनोशी संलग्न असलेले एकूण १९५ देश आहेत. त्यापैकी १५७ देश हे खिश्चन धर्मियांची बहुसंख्या असलेले आहेत. ५७ देश हे इस्लाम धर्मियांची बहुसंख्या असलेले आहेत. जगाची सध्याची लोकसंख्या ८०० कोटी इतकी आहे. त्यात खिश्चन धर्मिय ३१.५१ टक्के, इस्लाम धर्मिय २३.१८ टक्के, अन्य धर्मीय १६.३३ टक्के तर हिंदू धर्मीय १४.९८ टक्के , म्हणजेच सर्वात कमी लोकसंख्या असलेले आहेत.

खरं म्हणजे हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. ती एक संस्कृती, जीवन प्रणाली



आहे. इतर सर्व धर्म हे हिंदू धर्माच्या नंतर उदयास आलेले आहेत. कोणे एकेकाळी अर्धे जग हे हिंदुमय होते. जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिर हे कंबोडिया देशात आहे. थायलंड देशाच्या बँकॉक या राजधानीच्या ठिकाणी असलेल्या विमानतळाचे नाव, सुवर्णभूमी आहे. मलेशियातील काही शहरांची नावे, संस्कृती, चालीरीती, त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला असला तरी आजही प्रामुख्याने हिंदू पद्धतीप्रमाणे आहेत.

इतर धर्म, त्या धर्मांचे अनुयायी हे नेहमीच विस्तारवादी, आक्रमक राहिलेले आहेत. तर हिंदू धर्म हा सहिष्णू, इतर धर्मियांच्या भावनांचा आदर करणारा असा राहिला आहे आणि अजूनही तो तसाच आहे. परंतु याचा फटका जगातील हिंदू लोकसंख्येवर होत आहे. त्यामुळे ही जागतिक समस्या असून जगभरातील हिंदू धर्माच्या धुरिणांनी एकत्र येऊन या समस्येवर विचार विनिमय करून उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे.

अन्यथा माहेश्वरी समाजावरील लेखात ५० वर्षांनंतर माहेश्वरी समाज अस्तित्वात राहणार नाही, अशी जी सार्थ भिती व्यक्त केली आहे, तीच भीती दुर्दैवाने हिंदू धर्माविषयी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

म्हणून या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमय करून काही तातडीच्या तर काही दीर्घकालीन उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.शेवटी विचारातूनच कृती घडत असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

■ ■ ■

# ज्ञानेश्वरीचे चालते बोलते रूप : श्री संत ज्ञानेश्वरदास

संसार पथ श्रांतांची साऊली व अनाथा जीवांची माऊली असणाऱ्या कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती भगवान श्री ज्ञानराजांच्या मातृहृयाला फुटलेला प्रेमपान्हा म्हणजे ग्रंथराज ज्ञानेश्वरी असून; तो यावद्भूतलावर जन्माला आलेल्या अखिल मानवमात्रांना ' यावच्चंद्रदिवाकरौ ' पुरून उरेल एवढा भरभक्कम आहे.

तो चहूवेदा पासून तर दशोपनिषदापर्यंत, षडशास्त्रापासून तर अष्टदशपुरानांपर्यंत, संस्कृता पासून प्राकृतापर्यंत समग्र आध्यात्मिक सारस्वताला पचवून निर्माण झाला असल्यामुळे , तो सुज्ञा पासून अज्ञान पर्यंत संपूर्ण आबारवृद्धांना सदैव सुपाच्य असा आहे. म्हणूनच त्याचे अखंड प्राशन करून अनेक साधक सिद्धावस्थेला प्राप्त झालेले असतांना सुद्धा त्यांनी त्याचे रसास्वादन अजून पर्यंत सोडलेले नाही यात नवल नाही. तर जन्मोजन्मी त्या अमृत पानाचा अधिकार आम्हाला मिळत राहो हीच प्रार्थना ते भगवद् चरणी करीत असतात.

त्या आध्यात्मिक सारस्वताचा चुडामणी असणाऱ्या जगत्मान्य अद्वितीय स्वरूप श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी चे चालते बोलते रूप म्हणजे संतश्री वासुदेवजी महाराज उपाख्य श्रीसंत ज्ञानेश्वरदास हे होत. त्यांच्या दक्षिण द्वारीका महायोगपीठ श्रीक्षेत्र पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या प्रतिवार्षिक कुंभमेळ्यात आषाढी एकादशी महावारी पर्वकाळावर साजऱ्या होत असणाऱ्या पुण्यतिथी निमित्ताने थोडे चिंतन.

आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे मूळ स्रोत असणाऱ्या वेदादि ग्रंथातील सिद्धांत लोकसुलभ बनविण्यासाठी सांख्यादि आस्तीक षडदर्शनांमध्ये ते प्रक्रियांच्या माध्यमातून ग्रंथीत केले गेले असून; भगवान वेद व्यासांनी अष्टादशपुराणातून तेच अनेक आख्याने व उपाख्यातून लोकांच्या गळी उतरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

तेच वैदिक सिद्धांत स्वतः पचवून वारकरी संतांनी त्यांच्या वाङ्मयामध्ये स्वानुभवपूर्ण भाषेमध्ये शब्दबद्ध केले. श्रीसंत ज्ञानेश्वरदासांसारखे विद्वद वरिष्ठ भगवद्भक्त हे त्या अक्षर स्वरूप सिद्धांतांचे चालते बोलते रूप होत.

अपौरुषेय असणारा वेद हा भगवंतांचा निःश्वास तर, ज्ञानेश्वरी हा वाग्विलास असुन; संतश्री ज्ञानेश्वरदास हे त्या चैतन्याचा चिद्विलास होत. किंबहुना वेद व श्रीमद्भगवद्गीता ही भगवदोक्ती तर, ज्ञानेश्वरी ही कृती आणि जगद्गुरु तुकाराम महाराजांची गाथा ही त्या तत्त्वज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती असून; संतश्री ज्ञानेश्वरदास हे त्या समग्र ग्रंथांची चालती बोलती मूर्तीच होते.

म्हणूनच ज्यांच्या जीवनामध्ये भगवान श्री ज्ञानेशांसम तब्बल सदोतीस ग्रंथ रूपाने ओवीबद्ध साहित्य निर्मितीची अलौकिक प्रतिभा, भारतीय ऐक्याचे महान प्रतीक संत चरित्राचे आद्य इतिहासकार श्री संत नामदेव महाराज प्रमाणे ऐतिहासिक संशोधनात्मक लेखन तथा आपले स्थान न सोडता वैश्विक स्तरावर संप्रदायाचे प्रचार कौशल्य, नैष्टिक बालब्रह्मचारी असल्यामुळे स्वतः प्रपंच न करता अनेकानेक प्रापंचिकांना शांतीब्रह्म संत श्री एकनाथ महाराजांप्रमाणे प्रपंचासह परमार्थ कसा करावा याचे वर्म सांगून, प्रबोधनासह परिवर्तन घडविणारी सुयोग्य हातवटी तसेच जगद्गुरु तुकाराम महाराज प्रमाणे भगवान श्री ज्ञानेशांप्रति असणारी प्रपत्ती म्हणजेच आत्मशरणागती असल्यामुळेच ज्यांनी सदोतिसही ग्रंथ ज्ञानेश्वरदास या नावाने लिहून जगातील अज्ञानाधंकार नाहीसा करण्याकरिता प्रकाशित करून, लोककल्याणार्थ विनामूल्य वितरित केले.



अर्थातच वारकरी संप्रदायाच्या उपरोक्त संत चतुष्टयांचे सुद्धा ते संयुक्त रूपच होते. एवढेच नाही तर, संप्रदायावर होणाऱ्या कुठल्याही आघातांचा प्रतिकार करणारे ते एकमेव प्रतिकार केंद्रच होते. ज्यांच्यामध्ये ज्ञानेशांचे ज्ञान, नामदेवरायांचे प्रेम, नाथांची शांती तर जगद्गुरुंप्रमाणे विवेकासहित धगधगीत वैराग्याचे बळ या सर्व गुणांचा समसमुच्चय होता. अर्थातच ते त्या सर्व गुणांचे सुद्धा चालते बोलते मूर्तीमंत रूपच होते.

परमार्थ सांगणाऱ्या नाहीतर, जगणाऱ्या सत्पुरुषांच्या पुण्याईवर हे जगत स्थिर आहे. अर्थात तेच या जगताची धारणा शक्ती आहेत. संतश्री ज्ञानेश्वरदास हे नुसते ज्ञानेश्वरी व गाथा सांगणारे नाहीतर, प्रत्यक्ष जगणारे संत होते.

संतत्व हे नुसत्या वस्त्रावर नाही तर, चारित्र्यावर अवलंबून असते. संतश्री ज्ञानेश्वरदास श्वेतवस्त्रातील अलौकिक संन्याशी होते. त्यांचे साधूत्व हे साधनेने मोठे होते साधनांनी नाही. कारण भोगसामुग्रीच्या बाह्य औडंबराच्या अभावातही त्यांचा प्रभाव कायम होता . किंबहुना जे आपला वेदोपनिषदादि ग्रंथध्ययनाचा प्रभाव झाकून आपल्या कीर्तन प्रवचन व प्रबोधनाच्या कार्यक्रमातून लोक सुलभ शब्दशैलीचा वापर करून त्यांचा कृपाळू स्वभाव प्रगट करीत होते.

योगी सम्राट संत श्री गजानन महाराजांसारख्या महापुरुषांच्या पादस्पर्शाने पुनीत झालेल्या सातपुडा पर्वतरांगेच्या पवित्रतम् पायथ्याशी पवित्र तें कुळ पावन तो देश ' जेथें हरीचे दास जन्म घेती '' या तुकोक्तीनुसार निष्ठावंत गुरुभक्त संत श्री भास्कर महाराजांच्या परम पवित्र श्रीमंत जायले क्षत्रियकुळात अकोली ( जहाँगीर) नामक छोट्याशा खेड्यात शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते' या भगवदोक्तीनुसार श्रद्धा व विश्वासरुपी मातोश्री चंद्रभागा देवी तथा पिताश्री पुंडलिकराव पाटील जायले या भक्तद्वयांच्या निष्काम साधनारूप सरोवरातून २४ / २ / १९१७ फाल्गुन शुद्ध तृतीया शके १८३९ शनिवार रोजी सकाळी सात वाजता उगम पावलेली ही ज्ञानगंगा आजीवन अखिल मानवमात्रतील जडजीवांचे पापतापहरण करीत, जिज्ञासू साधकांना आपल्या तत्त्वज्ञानाचे अमृत प्राशन करवित, भगवान श्री ज्ञानेश तुकारामादि संतांच्या गंगा यमुना स्वरूप असणाऱ्या पालख्यांच्या संगम प्रसंगी भगवान पंढरीशरूपी महासमुद्रात दि. २/७/२००९ गुरुवार आषाढ शुद्ध एकादशी शके १९३१ च्या पर्वकाळावर भूवैकुंठ पंढरीक्षेत्री तद्रूप झाली. त्या ज्ञानगंगेस हे वाक्पुष्प समर्पित.

**संतश्री ज्ञानेश्वरदासानुदास**
भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ.
श्री संत वासुदेवजी महाराज स्मृति मंदिर
श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ.
९८२२५७९३१८

■ ■ ■

## वाहतूक पोलीस नेमके करतात काय?

**वाचक लिहितात**

देशाच्या मध्यभागी असलेल्या नागपूर शहरातून चारही दिशांना महामार्ग जातात. गेल्या काही वर्षात या महामार्गांचे रूंदीकरण, विस्तारीकरण झाले आहे, नवे मार्ग निर्माण करण्यात आलेत . केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून त्यांच्या विभागाने अत्यंत सुंदर महामार्ग निर्माण केलेत . तथापि, हे महामार्ग वाहतुकीसाठी की अवजड वाहने उभी करण्यासाठी? हा प्रश्न पडतो.

शहरातून पारडीच्या पुढे भंडारा, रायपूर कडे जाणाऱ्या महामार्गावर ठिकठिकाणी ट्रक आणि अन्य अवजड वाहने उभी केल्याचे दिसून येते . मार्गाच्या कडेला गॅरेजेच निर्माण झाले आहेत . वाहने रस्त्यावर उभी ठेवून दुरूस्ती केली जाते . परिणामी, इतर वाहन चालकांना मोठाच त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावर वाहने उभी करू नयेत, असल्यास कारवाई करण्याचे काम वाहतूक पोलीस विभागाचे आहे . परंतु, तेही बहुतेक वेळा ढाब्यावर दिसतात . संबंधित विभागाने याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे, जेणेकरून वाढते अपघात थांबवता येतील.

■ नरेश पडोळे, नागपूर.

## हार्ट अटॅक आल्यानंतर कितीवेळ छाती दाबावी?

हार्ट अटॅक वा कार्डिएक अरेस्टच्या केस वाढत आहेत. कोणी नृत्य करताना अचानक कोसळत आहे. तर कोणी एक्सरसाईज करताना अचानक जग सोडून जातोय. हृदयाची गती अचानक थांबल्याने असे मृत्यू होत आहेत. एका क्षणात व्यक्तीचा मृत्यू होत आहे.

या लाईफ थ्रेटपासून धोका असला तरी काही तातडीचे उपचार केले तर जीव वाचू शकतो. जर हृदय विकाराचा झटका आला असेल तर वेळीच सीपीआर (कार्डियो पल्मोनरी रिससिटेशन) दिला तर श्वास पुन्हा येऊ शकतो. अखेर हा सीपीआर काय असतो आणि तो हृदयाची गती कशी पुन्हा चालू करतो?



### पुन्हा हृदय चालू होऊ शकते

हार्ट डिसिजची रिस्क वेगाने वाढत आहे. अनेक लोकांना हृदय विकाराचा त्रास होत असतो. अनेक केसमध्ये अचानक हृदयाची गती थांबते. हार्ट अटॅक वा कार्डिएक अरेस्ट असे याला नाव दिले जाते. या स्थितीत दहा मिनिटांच्या आत जर सीपीआर दिला तर ५० टक्के लोकांमध्ये रुग्णालयात न जाताही प्राण वाचवता येतात.

हेल्थ तज्ज्ञांच्या मते हार्ट अटॅक वा कार्डिएक अरेस्ट येताच एकदम व्यक्तीचा मृत्यू होत नाही. त्यासाठी थोडा वेळ लागतो. या दरम्यान लागलीच सीपीआर देऊन हार्टला एक्टीव्ह करता येते. यामुळे मेंदू वा शरीराच्या अन्य भागात ऑक्सीजन पोहचण्यास मदत होते. अशा प्रयत्नामुळे हृदय पुन्हा श्वास घेऊ शकते.

### सीपीआर केव्हा द्यावा?

जर कोणा व्यक्तीचा बेशुद्ध होताच श्वास बंद पडत असेल तर समजून तर त्याला कार्डिएक अरेस्ट वा हार्ट अटॅक आला आहे. अशा वेळी या रुग्णाचा हाताच्या मनगटाची किंवा मानेची नस दाबून पाहावी. जर नाडी लागत नसेल तर हृदयाचा झटका आल्याचे समजून जावे. जर हात आणि पायात काहीच हालचाल जाणवत नसेल हा हार्ट अटॅकचा संकेत मानावा.

### सीपीआर देण्याची सोपी पद्धत

रुग्णाला तात्काळ कोणत्याही सपाट जागेवर पाठीवर झोपवावे. आता आपल्या एका हातावर दुसरा हात ठेवावा, दोन्ही हातांना रुग्णाच्या छातीच्या मध्यभागी ठेवावे. कोपरांना एकदम सरळ ठेवावे. हातांवर जोर देऊन जोराने दाबावे,असे एका मिनिटांत किमान शंभर वेळा करण्याचा प्रयत्न करावा. ३० वेळा छातीला दाबल्यानंतर दोन वेळा तोंडाने तोंडात श्वास द्यावा. यास माऊथ टु माऊथ रेस्पिरेशन म्हणतात

हाताने छातीला एक ते दोन इंच दाबल्यानंतर सामान्य स्थिती येऊ द्यावी. असे तोपर्यंत करावे जोपर्यंत रुग्णाचे श्वास परत येत नाहीत वा तो मेडिकल इमर्जन्सीपर्यंत येऊ न देता हे करावे. अशा प्रकारे वेगाने पम्पिंग केल्याने हृदयात ब्लड फ्लो येतो आणि कार्डिक अरेस्टवाला मनुष्याचे प्राण वाचतात. ■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### कोचिंग क्लासेस

जिकडे पहावे तिकडे दिसतेय
कोंचिग क्लासेसचा बोलबाला
शाळा कॉलेजच्या शिक्षणाचा
खरचं का दर्जा खालावला ?

क्लासेस पेक्षा ट्रेन शिक्षक
शाळा कॉलेज वरती
तरी पालकांचे पाय का बरे
क्लासेसकडे वळती?

संस्था व शिक्षकांनी यांच
करायलाच हवं आत्म चिंतन
नाही तर तो क्षण लांब नाही
होईल बरं खाजगीकरण ..!

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मध्ये लहान मुलीवर यशस्वी स्पाइन शस्त्रक्रिया

**नागपूर, ४ जुलै :** शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, वानाडोंगरी, नागपूर यांनी न्यूरोसर्जरी सेवांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. १२ वर्षांच्या मुलीला झालेल्या गंभीर पाठीच्या टीबीसह (स्पायनल ट्यूबरक्युलोसिस) कणा वाकडा होण्याच्या (कायफोस्कोलियोटिक डिफॉर्मिटी) गुंतागुंतीच्या आजारावर यशस्वी उपचार करून त्यांनी हे यश मिळवले. ही कहाणी चिकाटी, कौशल्य आणि सहानुभूतीपूर्ण उपचाराचे प्रेरणादायी उदाहरण आहे आणि हे संस्थेच्या अत्याधुनिक व बहुवैद्यकीय आरोग्यसेवांप्रती असलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

ही मुलगी आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील होती. तिला पाठीच्या टीबीचा (एक्स्ट्रा पल्मोनरी टीबी) त्रास होता, पण सुरुवातीला तिला फक्त पाठदुखी होत असल्याची तक्रार होती. स्थानिक उपचारांचा प्रयत्न करूनही योग्य निदान न झाल्याने तिची तब्येत आणखी बिघडली. चालताना ती पुढे वाकून चालू लागली, नीट बसता किंवा उभे राहता येईना, वजन खूप कमी झाले आणि तिच्या पाठीवर एक मोठा उंचवटा दिसू लागला. या अवस्थेला गिब्बस डिफॉर्मिटी म्हणतात. त्यामुळे ती कायमस्वरूपी अपंग होण्याचा आणि मूत्र व मलाशयावर ताबा राहाण्याचा धोका निर्माण झाला होता.

डॉ. परेश कोरडे यांनी पाठीच्या वाकटेपणावर एक अत्यंत जटिल शस्त्रक्रिया सुचवली. शस्त्रक्रियेमध्ये धोका असूनही, तिच्या कुटुंबीयांनी पूर्ण विश्वासाने ऑपरेशनसाठी संमती दिली. तब्बल ६ तास चाललेल्या या कठीण आणि उच्च जोखमीच्या शस्त्रक्रियेमध्ये डॉ. कोरडे आणि त्यांच्या समर्पित टीमने रॉड्स, स्क्रू आणि मेटल केजच्या मदतीने मुलीचा वाकलेला पाठीचा कणा सरळ केला आणि स्थिर केला आणि शस्त्रक्रिया



यशस्वीरित्या पूर्ण केली. तिचे मणके लहान आणि नाजूक असतानाही, डॉक्टरांनी अतिशय कौशल्याने तिचा कणा योग्य रचनेत आणला आणि मजबूत केला.

ॲनेस्थेशिया विभागाच्या असोसिएट प्रोफेसर डॉ. प्राची कोरडे यांनी भूल देण्याची प्रक्रिया अतिशय कौशल्याने हाताळली. त्यांनी सांगितले की मुलीचा पाठीचा कणा खूप वाकलेला असल्यामुळे भूल देणे आणि शस्त्रक्रियेसाठी योग्य पद्धतीने ठेवणे हे खूप कठीण होते. पण अचूक नियोजन आणि अनुभवाच्या जोरावर हे सर्व आव्हान सुरक्षितपणे पार करण्यात आले.

या शस्त्रक्रियेसाठी विविध विभागांतील तज्ज्ञांची एक टीम तयार करण्यात आली होती. यात डॉ. फिलिप्स अब्राहम (ऑर्थोपेडिक सर्जन), डॉ. प्रतिभा देशमुख (डायरेक्टर, ॲनेस्थेशिया विभाग), डॉ. अंजली बोरकर (एचओडी, ॲनेस्थेशिया विभाग), डॉ. प्रियांका टिकैत, डॉ. राजीव सोनारकर (एचओडी, सर्जरी विभाग), डॉ. सी. बोकाडे (एचओडी, बालरोग विभाग), तसेच जूनियर रेसिडेंट्स डॉ. गौरव शर्मा, डॉ. इंद्रजा रॉय, डॉ. शुभम गुप्ता आणि नर्सिंग टीम यांचा समावेश होता.

शस्त्रक्रियेनंतर मुलगी सरळ उभी राहून चालू लागली, हे पाहून संपूर्ण टीमला खूप आनंद आणि दिलासा मिळाला. डॉ. कोरडे यांनी भावूक होऊन देवाचे तसेच डॉ. अनुप मरार (डीएमआयएचईआर (डीयू) ऑफ कॅम्पस डायरेक्टर), डॉ. वसंत गावंडे (एसएमएचआरसी सीएमएस) आणि संपूर्ण शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर व्यवस्थापनाचे त्यांच्या सततच्या समर्थनासाठी मनःपूर्वक आभार मानले.

डॉ. परेश कोरडे यांनी तिचं नाव प्रेमाने प्रसिद्ध सिनेमातील 'झुकेगा नहीं' या डायलॉगप्रमाणे पुष्पा असं ठेवलं. त्यांनी सांगितले की या मुलीचा चमत्कारासारखा सुधारलेला आरोग्यप्रवास ही तिच्या धैर्य, जिद्द आणि प्रेमाने दिलेल्या आधुनिक वैद्यकीय उपचारांचे प्रतीक आहे.

हि यशस्वी केस पुन्हा एकदा दाखवते की शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर गरजू रुग्णांसाठी सुलभ, आधुनिक आणि नैतिक आरोग्यसेवा देण्यास कटिबद्ध आहे.

# ओप्पो इंडियाकडून रेनो१४ सिरीज लाँच



**मुंबई, ४ जुलै :** ओप्पो इंडियाने रेनो१४ सिरीज लाँच केली आहे, ज्यासह प्रत्येक वैशिष्ट्यामध्ये कार्यक्षमता, शक्ती आणि अचूकतेची मागणी करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी परिपूर्ण स्मार्टफोन अनुभव मिळणार आहे. रेनो१४ आणि रेनो१४ प्रो सह ओप्पो वापरकर्त्यांच्या फोटो कॅप्चर, एडिट करण्याच्या, तसेच त्यांच्या जीवनाला शेअर करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करत आहे. या स्मार्टफोन्समध्ये लॉसलेस ३.५ ऑप्टिकल झूम + जवळपास १२०एक्स डिजिटल झूम, प्रगत एआय एडिटिंग टूल्स आणि शक्तिशाली ऑल-राऊंडरमध्ये जलरोधक टिकाऊपणा आहे, जे प्रत्येक जीवनशैलीशी जुळून जातात. यासह रेनो१४ सिरीजने सेगमेंटमधील सर्वाधिक एआय इमेजिंग व उत्पादकता वैशिष्ट्यांची भर करत मर्यादांना दूर केले आहे, ज्यामुळे रेनो१४ सिरीज पैशांचे उत्तम मूल्य देते. ग्राहक फर्स्ट सेल्स कालावधीदरम्यान निव्वळ प्रभावी किंमत म्हणून ३४,२०० रूपयांच्या** सुरूवातीच्या किमतीपासून रेनो१४ सिरीज खरेदी करू शकतात.

ओप्पोने कॉर्निंगएँ गोरिलाएँ ग्लास ७आय आणि आयपी६६, आयपी६८ व आयपी६९ रेटिंग्जसह टिकाऊपणामध्ये वाढ केली आहे, जे धूळ, पाणी आणि जवळपास ८० अंश सेल्सिअसपर्यंतच्या उच्च दाबाच्या गरम पाण्यापासून संरक्षण देते.

स्पंज बायोनिक कूशनिंग डिझाइन धक्क्यांना सहन करते, ज्यामुळे नकळतपणे डिवाईसेस खाली पडल्यास उच्च दर्जाचे संरक्षण मिळते.

हे डिवाईसेस आकर्षक, बहुस्तरीय इंद्रधनुषी फिनिशसह येतात. रेनो१४ प्रो पर्ल व्हाइटसह वेल्वेट ग्लास आणि टायटॅनियम ग्रेसह रिफ्लेक्टिव्ह मॅट फिनिशमध्ये येतो. रेनो१४ पर्ल व्हाइट आणि फॉरेस्ट ग्रीनसह ल्युमिनस लूप डेकोमध्ये येतो.

दोन्ही मॉडेल्समध्ये ग्लोव्ह-अनुकूल, अल्ट्रा-स्लिम-बेझल १२० हर्ट्झ एलटीपीएस अमोलेड डिस्प्ले आहे, जो १२०० नीट्सचे सर्वोच्च ब्राइटनेस देतो. रेनो१४ प्रो मध्ये ६.८३-इंच फ्लेक्झीबल अमोलेड डिस्प्ले आहे, तर रेनो१४ मध्ये काहीसा लहान ६.५९ इंच डिस्प्ले आहे. दोन्ही डिवाईसेसमध्ये सर्वोत्तम व्युइंग अनुभवासाठी १.५के रिझॉल्यूशन आणि ९३ टक्क्यांहून अधिक स्क्रिन-टू-बॉडी रेशिओ आहे.

उच्च दर्जाची डिझाइन क्वॉलिटी व शक्तिशाली डिझाइन असताना देखील दोन्ही मॉडेल्स वजनाने हलके व स्लिम आहेत.

# क्योरफूड्स इंडिया लिमिटेडने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

**मुंबई, ४ जुलै :** क्योरफूड्स इंडिया लिमिटेड ही ग्राहक पसंती आणि आहार गरजांना पूरक अशा व्यापक खाद्यपदार्थांची सेवा पुरविणारी इंटरनेट आधारित मल्टी-ब्रँड फूड सर्व्हिसेस कंपनी आहे. कंपनीने आपले ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) मार्केट रेग्युलेटर सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांच्याकडे दाखल केले आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंतच्या स्थितीनुसार, क्योरफूड्स ही आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ऑपरेशन्समधून मिळालेल्या महसुलाच्या आधारे (फूड डिलिव्हरी मार्केटप्लेस वगळून) भारतातील दुसऱ्या क्रमांकाची डिजिटल-फर्स्ट फूड सर्व्हिसेस कंपनी आहे.

ही ऑफर १ दर्शनी मूल्याच्या नवीन शेअर्सच्या इश्यूमधून एकूण ८,०००.०० मिलियन इतकी रक्कम उभारणाऱ्या नवीन इश्यूचा आणि ४८,५३७,५९९ इक्विटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेलचा समावेश करते. या ऑफर फॉर सेलमध्ये आयर्न पिलर पीसीसी (आयर्न पिलर पीसीसी सेल सी आणि सेल ई यांच्या वतीने) कडून १९,०८८,६७० शेअर्स, क्रिमसन विंटर लिमिटेडकडून ९,७५९,६६० शेअर्स, ॲक्सेल इंडिया व्ही (मॉरिशस) लिमिटेड कडून ४,५७५,३३० शेअर्स, चिराटे व्हेंचर्स इंडिया फंड फोरकडून ३,६६६,०२० शेअर्स, ग्लोबल ई-कॉमर्स कॉन्सॉलिडेशन फंड एल.पी. कडून ३,५२४,२१३ शेअर्स, चिराटे व्हेंचर्स मास्टर फंड फोर कडून २,७९०,६१९ शेअर्स, अल्टेरिया कॅपिटल फंड टू स्कीम वन कडून १,४३१,१५० शेअर्स, क्योरफिट हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड कडून १,२८१,५१० शेअर्स, श्रीपाद श्रीकृष्ण नाडकर्णीकडून १,१५४,४९० शेअर्स, होरायझन टेक्नो प्रायव्हेट लिमिटेडकडून ९३०,९०० शेअर्स आणि झेफायर पीकॉक इंडिया ग्रोथ फंडकडून ३३५,०३७ शेअर्सचा समावेश आहे; हे सर्व विक्री करणारे भागधारक (सेलिंग शेअरहोल्डर्स) म्हणून ओळखले जातात.

कंपनी आयपीओमधून मिळणाऱ्या १५२.५४ कोटींच्या निव्वळ उत्पन्नाचा उपयोग प्रामुख्याने विस्तार आणि उपकरणांच्या खरेदीसाठी करणार आहे. यामध्ये १२६.३२ कोटींचा वापर नवीन क्रिस्पी क्रिम क्लाउड किचन्स, रेस्टॉरंट्स, किऑस्क्स आणि सेंट्रल किचन्स स्थापन करण्यासाठी केला जाणार आहे; १९.९१ कोटी निवडक विद्यमान क्लाउड किचन्समध्ये नव्या ब्रँड्सचा समावेश करून, त्यांचा विस्तार करण्यासाठी वापरले जातील आणि ६.३१ कोटी यंत्रसामग्री, उपकरणे खरेदी, तसेच धोरणात्मक उपक्रमांसाठी वापरण्यात येणार आहेत. क्योरफूड्स भारतातील टॉप दोन क्लाउड किचन कंपन्यांमध्ये सेवा स्थानांच्या दृष्टीने ३१ मार्च २०२५ पर्यंत समाविष्ट आहे.

# रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण जुन्या दुखापती असलेल्या रुग्णांसाठी नवी आशा घेऊन आले आहे

**अमरावती, ४ जुलै :** अनेक लोक पूर्वीच्या दुखापती किंवा इम्प्लांटमुळे होणाऱ्या गुडघेदुखीसोबत जगत राहतात हे भीतीमुळे नाही, तर अनेकदा प्रगत उपचार पर्यायांबद्दलच्या जागरूकतेच्या अभावामुळे होते.

अमरावतीच्या सनशाईन सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वीरित्या पार पडलेल्या रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमुळे, पूर्वीच्या पायाच्या फ्रॅक्चरमुळे आणि जुन्या इम्प्लांटमुळे वेदना आणि चालण्याच्या त्रासासह जगणाऱ्या एका ६४ वर्षीय व्यक्तीने आता बरे होण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने पाऊले टाकली आहेत. हे प्रकरण अधोरेखित करते की रोबोटिक तंत्रज्ञान अगदी गुंतागुंतीच्या परिस्थितीतही अचूक, सुरक्षित आणि प्रभावी उपाय प्रदान करते, ज्यामुळे रुग्णांना हालचाल पुन्हा मिळविण्यात आणि जीवनाचा दर्जा सुधारण्यास मदत होते.



ही गुंतागुंत असूनही, डॉ. देशमुख यांच्या टीमने रोबोटिक टोटल नी रिप्लेसमेंट आणि अर्धवट इम्प्लांट काढण्याची शस्त्रक्रियाहे सर्व एकाच शस्त्रक्रियेत यशस्वीरित्या पार पाडले. पारंपरिकरित्या, अशा प्रकरणांमध्ये दोन वेगवेगळ्या शस्त्रक्रियांची आवश्यकता असते, परंतु रोबोटिक तंत्रज्ञानाच्या मदतीने टीमने एकाच वेळी उच्च अचूकता आणि कार्यक्षमता प्राप्त केली. या दृष्टिकोनामुळे गुंतागुंतीचा धोका कमी होतो आणि शस्त्रक्रियेचे दीर्घकालीन परिणाम सुधारतात. रोबोटिक-सहाय्यक प्रक्रिया विशेषतः अशा गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये फायदेशीर ठरतात जिथे अचूकता आणि वैयक्तिकृत काळजीचा बरे होण्यावर लक्षणीय परिणाम होतो.

रोबोटिक शस्त्रक्रिया आम्हाला ३डी व्ह्यू देते आणि अधिक अचूकतेने शस्त्रक्रियेचे नियोजन करून ती करण्यास मदत करते, असे डॉ. धनंजय देशमुख यांनी स्पष्ट केले. रुग्णाच्या पायात जुनी मेटल प्लेट असूनही, आम्ही एकाच ऑपरेशनमध्ये सुरक्षितपणे शस्त्रक्रिया करू शकलो. सर्वात उत्साहवर्धक गोष्ट म्हणजे, एका आठवड्याच्या आत ते आपला गुडघा ९० अंशांपर्यंत वाकवू शकले आणि डिस्चार्जच्या वेळी आधाराने चालू लागले.

रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि फक्त चार दिवसांनंतर डिस्चार्ज देण्यात आला, तेव्हा ते वॉकरच्या मदतीने चालत होते आणि जखमेशी संबंधित कोणतीही समस्या दिसून आली नाही. हे प्रकरण दाखवून देते की रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण जुन्या दुखापती किंवा इम्प्लांट्सचा समावेश असलेल्या गुंतागुंतीच्या परिस्थितीवर यशस्वीपणे उपचार करू शकते. जलद रिकव्हरी, कमी वेदना आणि कमी गुंतागुंत यामुळे, हे तंत्रज्ञान सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रियांमध्ये वेगाने एक 'गेम-चेंजर' बनत आहे.



# वागले की दुनिया मालिकेत विवानला सखीच्या आयुष्यातून हद्दपार करण्याचा राजेशचा प्रयत्न फसला

**मुंबई, ४ जुलै :** सोनी सबवरील वागले की दुनिया मालिकेत मध्यमवर्गीय कुटुंबातील छोटे छोटे आनंद, संघर्ष आणि यशापयश यांचे चित्रण बघायला मिळते. हे जग हृदयस्पर्शी क्षणांनी आणि वास्तविक जगातील आव्हानांनी भरलेले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, साई दर्शन सोसायटीमध्ये उत्साह संचारलेला दिसला, कारण त्यांची इमारत पुनर्विकासासाठी निवडण्यात आली आहे. पण अचानक एक नाट्यमय वळण येते आणि एका मध्यरात्री भूमी हादरते आणि इमारतीच्या बांधकामास मोठे नुकसान होते.

आगामी भागांमध्ये, वागले कुटुंबातील वातावरण तंग झाले आहे, कारण सखी (चिन्मयी साळवी) आणि विवान (नमित शाह) यांच्यातील वाढत्या जवळीकीमुळे राजेश (सुमित राघवन) फारच अस्वस्थ झाला आहे. त्यात राधिका (भारती आचरेकर)ने केलेल्या भाकितामुळे तणाव आणखी वाढला आहे. राधिकाने भविष्य वर्तविले आहे की, सखीने लवकरात लवकर विवाहबद्ध झाले पाहिजे, नाही तर भविष्यात गरोदरपणाची समस्या होऊ शकते. चिंताग्रस्त राजेश विवानला लांब ठेवण्याच्या प्रयत्नात आहे. पण त्याच्या कृतींमुळे उलट सखी आणखीनच विवानकडे आकृष्ट होत आहे. एकीकडे, वागले कुटुंब राधिकाला अचानक झालेल्या स्मृतिभ्रंशामुळे चिंतित आहे, तर दुसरीकडे, एका अपघातात विवान सापडल्यानंतर आपल्याला त्याच्याविषयी वाटणाऱ्या खऱ्या भावना काय आहेत हे सखीला समजते. सखीच्या वाढदिवसाच्या पार्टीत हे नाट्य पराकोटीला पोहोचते. विवान सखीला लग्नाची मागणी घालतो, त्यात राजेश आणि वंदना त्याला अडवतात, ज्यांना सखी आणि विवानच्या गुप्त भेटीविषयी समजले आहे. या क्षणी सर्व कुटुंब एका धक्क्यात जाऊन निःशब्द होते.

आपल्या मुलीच्या जीवनातील या मोठ्या घडामोडीशी राजेश जुळवून घेऊ शकेल का? की नवीन सुरुवातीवर जुन्या भीतीचे सावट येईल?

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, एक पिता या नात्याने राजेशला आपल्या मुलीचे संरक्षण करणे आणि तिने केलेल्या निवडीवर विश्वास ठेवणे भाग आहे. येथे, आपल्याला एक पिता दिसतो, ज्याला आपल्या मुलीला गमावण्याची भीती वाटते आहे, आणि ते केवळ प्रेमापोटी आणि जबाबदारीच्या भावनेतून.

# टेनेको क्लीन एअर इंडिया लिमिटेडतर्फे आयपीओसाठी सेबी कडे डीआरएचपी सादर

**मुंबई, ४ जुलै :** अमेरिकेत मुख्यालय असलेल्या टेनेको समूहाचा एक भाग असलेली टेनेको क्लीन एअर इंडिया लिमिटेड ही कंपनी एक प्रमुख जागतिक टियर १ ऑटोमोटिव्ह घटक पुरवठादार असून (स्त्रोत: क्रीसील अहवाल) कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सेबीकडे प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) साठी सादर केला आहे.

टेनेको मॉरिशस होल्डिंग्स लिमिटेड, टेनेको (मॉरिशस) लिमिटेड, फेडरल-मोगुल इन्व्हेस्टमेंट्स बी.व्ही., फेडरल-मोगुल पीटीवाय लिमिटेड आणि टेनेको एलएलसी हे कंपनीचे प्रवर्तक आहेत.

या ऑफरमध्ये टेनेको मॉरिशस होल्डिंग्स लिमिटेड (प्रवर्तक विक्री समभागधारक) कडून ३००० कोटी रु. पर्यंतच्या एकूण ऑफर फॉर सेलचा समावेश आहे. प्रत्येक इक्विटी शेअरचे दर्शनी मूल्य १० रु. आहे.

टेनेको क्लीन एअर इंडिया लिमिटेड ही टेनेको समूहाचा एक भाग आहे. अमेरिकेत मुख्यालय असलेली ही एक प्रमुख जागतिक टियर ऑटोमोटिव्ह घटक पुरवठादार आहे. टेनेको समूहाने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या वर्षात १६,७७७ दशलक्ष अमेरिकन डॉलर उत्पन्न मिळवले. कंपनीने भारतात आपला पहिला उत्पादन प्रकल्प १९७९ मध्ये परवाणू येथे स्थापन केला. ही कंपनी भारतीय ओईएमएस व निर्यात बाजारपेठांसाठी महत्वपूर्ण, अत्यावश्यक, अत्याधुनिक अभियांत्रिकी व तंत्रज्ञान-आधारित क्लीन एअर, पॉवरट्रेन आणि सस्पेन्शन सोल्यूशन्स तयार करते आणि त्यांचा पुरवठा करते.

या कंपनीची उत्पादने वापरणारे ओईएमएस प्रकारांमधील ग्राहक पुढील प्रमाणे आहेत: (१) प्रवासी वाहने, (२) व्यावसायिक वाहने. यामध्ये व्यावसायिक ट्रक्स आणि ऑफ हायवे व्हेईकल्स यांचा समावेश होतो आणि (३) औद्योगिक आणि इतर उपयोग. यामध्ये जनरेटर सेट्स, ३.५ टनांपेक्षा कमी वजन असलेली लहान व्यावसायिक वाहने, दुचाकी आणि तीनचाकी (औद्योगिक/इतर) यांचा समावेश होतो. ही कंपनी विक्री पश्चात बाजारपेठे मध्ये देखील मोटोकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड मार्फत विक्री करते. ही टेनेको एलएलसी व त्याच्या समूह कंपनीची उपकंपनी आहे.

# हे ४ खाद्यपदार्थ कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकतात

**नागपूर, ४ जुलै :** हृदयरोग आणि उच्च रक्तदाब अशा जीवनशैली आजारांवर प्रतिबंध ठेवण्यासाठी कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कोलेस्ट्रॉलवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी संतुलित आहार महत्त्वाचा आहे.



बदाम, ओट्स, संपूर्ण धान्य, फळे व भाज्या अशा पौष्टिक खाद्यपदार्थांचे सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल पातळ्यांचे नियमन करण्यास मदत होऊ शकते. पौष्टिक आहारासह नियमितपणे व्यायाम करणे देखील आवश्यक आहे. या लेखामध्ये पौष्टिक खाद्यपदार्थांबाबत माहिती जाणून घेऊया, जे दैनंदिन आहारामध्ये समाविष्ट केल्यास आरोग्यदायी कोलेस्ट्रॉल पातळ्या राखण्यास मदत करू शकतात.

बदाम: बदाम पौष्टिक पॉवरहाऊस आहेत. बदामांमध्ये प्रथिने, मॅग्नेशियम, कॅल्शियम व झिंक असे १५ आवश्यक पौष्टिक घटक असतात. दैनंदिन आहारामध्ये बदामांचा समावेश केल्याने एकूण व एलडीएल कोलेस्ट्रॉल पातळ्या कमी होण्यास मदत होऊ शकते, तसेच हृदयासाठी हानीकारक असलेली जळजळ देखील कमी होऊ शकते. मूठभर बदामांचे सेवन केल्याने एचडीएल कोलेस्ट्रॉलमध्ये देखील सुधारणा होऊ शकते, पोटावर येणारी चरबी कमी होऊ शकते आणि कमरेचा घेर कमी होऊ शकतो. हे सर्व हृदयरोगासाठी धोकादायक घटक आहेत. आहारामध्ये सहजपणे बदामांचा समावेश करता येतो, जसे सलाड्स, डेझर्ट्स किंवा स्मूदीजमध्ये बदाम टाकत ते पौष्टिक करता येतात. बदाम अत्यंत पौष्टिक आहेत.

संपूर्ण धान्य आणि ओट्स: आहारात संपूर्ण धान्य समाविष्ट केल्याने अनेक आरोग्यसंबंधित फायदे मिळतात, जसे रक्तदाब सुधारतो, हृदयसंबंधित आजारांचा धोका कमी होतो, वजनावर नियंत्रण राहते आणि एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. विशेषतः ओट्स कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि हृदयसंबंधित आजारांचा धोका कमी करण्यास गुणकारी आहे. आहारामध्ये संपूर्ण धान्य आणि ओट्स समाविष्ट करण्यासाठी ब्रेकफास्टकरिता ओटमील किंवा संपूर्ण धान्य निवडा, बेकिंगमध्ये संपूर्ण धान्याचे पीठ वापरा, सलाड किंवा सूपमध्ये शिजवलेले संपूर्ण धान्य वापरा, स्मूदीमध्ये ओट्स मिसळा आणि सँडविचसाठी संपूर्ण धान्याचे ब्रेड निवडा.

फळे: फळांनी समृद्ध आहार लिपिड आरोग्य मोठ्या प्रमाणात सुधारू शकते, कारण अशा आहारामध्ये फायबर कन्टेन्ट, उच्च पाण्याची पातळी आणि कमी संतृप्त फॅट असते. हे घटक कोलेस्ट्रॉल कमी करतात, तसेच भूकेवर नियंत्रण देखील ठेवतात, भूकेचे शमन करतात आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. आहारामध्ये फळांचा प्रभावीपणे समावेश करण्यासाठी फळांना स्मूदीमध्ये मिसळा, सेरेल, दही किंवा सलाडमध्ये मिक्स करा, पौष्टिक स्नॅक म्हणून सेवन करा, फळांचा रस किंवा फ्रोजन ट्रीट्स तयार करा आणि अधिक पौष्टिकतेसाठी बेकिंग व चवदार पदार्थांमध्ये फळांचा वापर करा.

लसूण: आहारामध्ये नियमितपणे लसूण समाविष्ट केल्याने एकूण आणि एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होऊ शकते. स्वयंपाक करताना लसूण भाजून भाज्यांमध्ये परतून घ्या किंवा सॅलड, डिप्स आणि करीमध्ये समाविष्ट करत जेवण तयार करा. अतिरिक्त चवीसाठी लसूण पावडर घाला किंवा डाळीसारख्या खाद्यपदार्थांमध्ये मिक्स करा.

आरोग्यदायी आहाराचे सेवन करण्यासोबत हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी नियमितपणे व्यायाम करणे देखील महत्त्वाचे आहे. या आहारसंबंधित आरोग्यदायी सवयी अंगिकारा आणि नियमितपणे व्यायाम करा, ज्यामुळे कोलेस्ट्रॉल पातळ्यांवर नियंत्रण राहिल आणि आरोग्य उत्तम राहिल.

# आज का अंदाज

शनिवार ५ जुलै २०२५

## पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| ३ ६ ९ ० | जोडी येण्याचे संकेत अधिक |
| १५७ १६९ ३६० १९० | |
| ४९० ३४९ २७० २८० | |
| २२९ २६८ ४५० ३७० | |
| ३२ ६२ ९१ ०१ | |
| ३४ ६४ ९७ ०७ | |
| ३५ ६५ ९८ ०८ | |

**५ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | ४६ | ५३ | ८९ |
| १९ | ४९ | ५६ | ८६ |
| १२ | ४२ | ५० | ८० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत इमरतीला वाचवण्यासाठी युग आणि कैरी एकत्र आले

**मुंबई, ४ जुलै :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत प्रेमाच्या विविध छटा उलगडून दाखवल्या आहेत आणि त्याकडे बघण्याची पुरुषांची आणि स्त्रियांची दृष्टी कशी बऱ्याचदा वेगळी असते, हे दाखवले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, युग (शब्बीर अहलूवालिया) आपल्या एका अशीलाच्या बचावासाठी आपला शत्रू विक्रम (रजत दहिया) याच्या विरुद्ध एक केस लढत आहे. या प्रकरणात कैरी (आशी सिंह) युगला वाचवून ती केस त्याला जिंकवून देते.

आगामी भागांमध्ये, कैरीची हरवलेली बहीण इमरती (दीपल सतिजा)ला शोधण्यासाठी कैरी आणि युग एकत्र होऊन प्रयास करतात. त्यावेळी त्यांना समजते की कैरीच्या वडिलांनी म्हणजे कुंदन (मानवेंद्र झा) ने तिचे अपहरण केले असते. त्याचा अंधारा भूतकाळ समजल्यावर सगळ्यांना धक्का बसतो. कैरीच्या भावंडांना असे वाटत असते की, कुंदन दुबईत राहतो, पण कटू सत्य हे आहे की, तो १६ वर्षे तिहार तुरुंगात होता. हे गुपित कैरी आणि तिचा भाऊ बिस्किट (मोहम्मद सौद) ने लपवून ठेवले असते. कुंदन कैरीला ब्लॅकमेल करत असतो की, तिने जर त्याला तुरुंगातून सोडवायला मदत केली नाही, तर तो तिच्या भावंडांना हे सांगेल की कैरी त्यांची सख्खी बहीण नाही.

हे सत्य उघड होऊन न देण्यासाठी कैरी जोखीम घेईल का? की कुंदनच्या भूतकाळामुळे पुन्हा एकदा तिच्या कुटुंबाची वाताहत होईल?

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, कैरीने पहिल्यापासून आपल्या सगळ्या भावंडांना, आपल्या विश्वाला जोडून ठेवण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. पण जेव्हा या सुरक्षेला खिंडार पडू लागते तेव्हा प्रेम आणि जबाबदारी म्हणजे नक्की काय याची कसोटी होते.

# राशीभविष्य

**मेष :** व्यवसायात प्रगतीसोबतच नफाही होईल. कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर लवकर विश्वास ठेवू नका. न्यायालयीन प्रकरणांमध्ये मित्राची खूप मदत होईल. नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते.

**वृषभ :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. महत्त्वाच्या कामासाठी धावपळ करावी लागेल. जवळच्या मित्रांसोबत एकत्र काम करणे फायदेशीर ठरेल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी प्रगतीशील असेल. महत्त्वाच्या कामात तुम्हाला यश मिळेल. तुमचे सर्व काम हुशारीने करा. राजकारणात, तुम्हाला एका महत्त्वाच्या मोहिमेचे नेतृत्व करण्याची संधी मिळेल.

**कर्क :** जमीन खरेदी-विक्रीशी संबंधित लोकांना अनावश्यक अडथळे आणि विलंबांचा सामना करावा लागू शकतो. शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने निर्णय घ्या. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका.

**सिंह :** आज सत्तेत असलेल्या लोकांना भेटवस्तू आणि सन्मान मिळेल. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. वाहन खरेदी करण्याच्या योजना यशस्वी होतील. ौद्योगिक योजनेसाठी अपेक्षित सहकार्य मिळेल.

**कन्या :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल. तुम्हाला एखाद्या शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल. नोकरी मिळवण्याबाबत फोन येऊ शकतो. सरकारी मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी समस्या कमी होतील. संगीत, गायन, नृत्य इत्यादी क्षेत्रात काम करणाजया लोकांना लक्षणीय यश मिळेल. व्यवसायात नवीन करार होतील. इमारतीच्या बांधकामात लोकांना लक्षणीय यश मिळेल.

**वृश्चिक :** कुटुंबात कठोर शब्द वापरू नका. कामाच्या ठिकाणी, सरकारी विभाग अडथळे निर्माण करू शकतो. तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. अपेक्षित आर्थिक लाभ न मिळाल्याने अस्वस्थ व्हाल.


**धनु :** आज शत्रू तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करेल. तुमच्या सामाजिक प्रतिष्ठेबद्दल सावधगिरी बाळगा. वादविवाद टाळा. स्वत:वर विश्वास ठेवा. तुमचे काम पूर्ण होईपर्यंत ते उघड करू नका.

**मकर :** आज कुटुंबात एखादी आनंददायी घटना घडू शकते. व्यवसायाच्या क्षेत्रात नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने लोकांना यश मिळेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामात काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या.

**कुंभ :** मेहनतीच्या तुलनेत व्यवसायात कमी नफा मिळाल्याने तुम्ही नाखूष असाल. शत्रू पक्षापासून सावध रहा. नवीन काम सुरू करण्यापूर्वी, त्याचा नफा आणि तोटा याचा काळजीपूर्वक विचार करा.

**मीन :** व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. राजकारणात तुम्हाला काही महत्त्वाची जबाबदारी मिळेल. राजकारणात तुमचे वर्चस्व वाढेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता.

# शब्दकोडे क्रमांक २१५५



**आडवे शब्द :-**


१) चर्चेची देवाणघेवाण
५) एक पाताळ
९) शोभिवंत दिसण्यासारखी रचना
११) उत्सवाचे दिवस
१३) गारवा
१६) जावकच्या विरुद्ध
१७) बारीक केस
१८) बगळा
१९) शनिवार
२२) सोपे नसलेले
२३) श्रीरामाचे वडील २५) मनुष्य
२७) घोड्यास दाणा चारण्याची पिशवी
२९) विश्वातील सर्व भाग
३१) नवरदेव
३२) चिंचेची चव
३३) कोपरा
३४) घागरा
३५) पाण्यावरील तेलाचा थर
३७) शेळी
३९) दिशादर्शक यंत्र
४०) नंतर
४१) गावाचा कारभार पाहणारा
४२) नोकरी नसलेला
४३) बोलण्यातील सत्यता
४४) माघारी येणे
४५) भीती
४६) मान्यतापत्र
४८) उद्याच्या नंतचा दिवस
४९) चुलती
५०) मरुत, पवन
५२) सहाय्य
५३) उपस्थित
५५) जाणता अजाणता
५७) हितकर
५९) यात्रेस जाणे
६०) गाव, नगर
६१) कहाणीतील गाव
६३) ढीग
६४) परग्रहाहून येणारे वाहन छोटी ताटली
६५) तुरुंग
६६) समशेर

**उभे शब्द :-**

१) परदेशी
२) अर्धा शेर
३) अर्धा
४) सवडीप्रमाणे
५) लक्ष्मीचे एक नाव
६) आंब्याची पोळी
७) अधाशीपणा
८) प्रश्न
१०) रोखलेली नजर
१२) बारीक झणझण
१४) मनावरील ताण
१५) त्वरित
१९) कैकयीची दासी
२०) उपयोग
२१) रमापती
२२) कोणीतरी एक, भलता
२३) पर्वतामधले खोरे
२४) वस्तूची मांडणी
२६) नरकात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
२८) मोठे डोळे
३०) चामड्याच्या वस्तू तयार करणारा
३२) शरीर
३३) न वापरलेली, नवी
३४) बातमीदार
३६) बंगाल प्रांत
३८) एका बाजूस झुकणे
३९) नकारच्या विरुद्ध
४१) कबूतर
४२) बेटकुळी
४४) पुन्हा-पुन्हा
४६) तसराळे
४७) नियमित यात्रेला जाणारा
४८) अधिकाराचे स्थान
४९) मोटार ( इं )
५०) वालुकामय जमीन
५१) सरसरीत
५२) श्रीयुत
५३) उगाच
५४) सोन्या-चांदीचा धागा
५६) नवीन आलेला
५८) रंग उडालेला
६२) पारद, एक खनिज द्रव
६३) पोपट

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



शनिवार, दि. ५ जुलै २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ६

## पालकमंत्री ५ जुलै रोजी चंद्रपुरात

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके ५ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता वन अकादमी येथे आगमन व राखीव, सकाळी ११.३० वाजता नियोजन भवन येथे पीएम जनमन व धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानचा आढावा तसेच १०० दिवस कार्यालयीन सुधारणा मोहिमेंतर्गत निवड झालेल्या कार्यालयांना प्रशस्तीपत्र प्रदान कार्यक्रम, दुपारी १२ वाजता प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृह येथे धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान कार्यक्रमाला उपस्थिती, दुपारी २ वाजता ज्युबली हायस्कूल चंद्रपूर येथे चांदा ज्योती सुपर १०० अभ्यासिका वर्गाचे उद्घाटन.

## आदिवासी उमेदवारांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : राज्य शासनाच्या वर्ग-३ व वर्ग-४ पदाकरीता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी आदिवासी उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर शिकवणी १ ऑगष्ट २०२५ पासून सुरु होणार आहे. सदर प्रशिक्षण १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. अनुसूचित जमातीच्या (एऊ) प्रवर्गातील उमेदवारांनी २९ जुलै २०२५ पर्यंत आदिवासी 'उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय भवन, चंद्रपूर या कार्यालयात आधार कार्ड, शैक्षणिक कागदपत्रे सादर करावे.

# शहरातील ६२ जिर्ण इमारतींना मनपाची नोटीस

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : महापालिका क्षेत्रातील शिकस्त इमारतींपासून परिसरातील रहिवाशांच्या जीविताला निर्माण होऊ शकणारा संभाव्य धोका पाहता चंद्रपूर महानगरपालिकेने कारवाई करण्यास सुरवात केली असुन मागील काही दिवसात ६२ जीर्ण इमारतींना नोटीस देण्यात आली आहे.



पावसाळ्यात दरवर्षी महापालिका क्षेत्रातील जीर्ण व शिकस्त इमारतींचा सर्व्हे करण्यात येतो. यात आढळलेल्या धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६४ अन्वये नोटीस जाहीर करण्यात येते. चंद्रपूर मनपातर्फे झोन १ अंतर्गत ३०, झोन २ अंतर्गत २० तर झोन ३ अंतर्गत १२ अश्या एकुण ६२ धोकादायक इमारतींना नोटीस देण्यात आली आहे.

नोटीसनुसार धोकादायक इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व व्यक्तींना व महत्वाचे साहित्य अन्यत्र सुरक्षित ठिकाणी तात्काळ स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले असुन त्वरित आपल्या इमारतीची दुरुस्ती करुन घेण्याचे तसेच त्यांनतर आपल्या इमारतीचे नोंदणीकृत स्ट्रक्चरल अभियंता यांचेकडून सर्वेक्षण करुन त्याबाबतचे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट मनपा कार्यालयास सादर करण्यास कळविण्यात आले आहे.

अश्या ६ इमारती यापुर्वी मनपाने निर्लेखित केल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी सदर कारवाई दरवर्षी मनपातर्फे करण्यात येते मात्र काही मालमत्ताधारक जिवाची पर्वा न करता त्याच इमारतीत तळ ठोकून राहतात. यामुळे परिसरातील रहिवाशांच्या जिवालासुद्धा धोका निर्माण होतो. मग अश्या प्रसंगी निष्कासीत करण्याची अथवा नियमानुसार कारवाई मनपातर्फे करण्यात येते.

# सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत ८ जुलैला

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ४ जुलै** : तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सन २०२५ ते २०३० या कालावधीकरीता सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्याबाबतचे प्रसिद्धी पत्रक राजुरा तहसीलदार डॉ. ओमप्रकाश गोंड यांनी काढले असून दि. ८ जुलै रोज मंगळावार दुपारी २.०० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजुरा येथील सभागृह तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद सदस्य्, पंचायत समिती सभापती, उपसभापती, सर्व पचांयत समिती सदस्य् व ग्रामपंचायतीचे सदस्य् तसेच सर्व ग्रामस्थ यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत नियम, १९६४ (सरपंच, उपसरपंच) निवडणूक नियम, १९६४ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे कार्यालयीन पत्रानुसार राजुरा तालुक्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग तसेच महिलांसाठी सरपंच पदाकरीता सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करुन दिल्या प्रमाणे तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करायचे आहे.

याकरिता उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजुरा येथील सभागृहात सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या वेळी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद सदस्य्, पंचायत समिती सभापती, उपसभापती, सर्व पचांयत समिती सदस्य् व ग्रामपंचायतीचे सदस्य् तसेच सर्व ग्रामस्थ यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान राजुरा तहसीलदार डॉ. ओमप्रकाश गोंड यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी सोलर कृषीपंप धोरणात सुधारणा आवश्यक

### आमदार सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभेत मागणी, सोलर पंप उपयुक्त; मात्र गरजेनुसार एजी पंपही द्यावेत

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधताना राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सोलर कृषीपंप धोरणात सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली.

विविध भागातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, शेतकऱ्यांच्या गरजेनुसार एजी पंप देण्याची मागणी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आ. मुनगंटीवार यांनी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे केली.



आ. मुनगंटीवार यांनी सीआरआय कंपनीच्या सोलर पंपांबाबत आलेल्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे व दुरुस्तीच्या विलंबाकडे विधानसभेत लक्ष वेधले.

'सोलर पंप उपयुक्त आहेत, मात्र जेथे सोलर पंप काम करत नाहीत, तेथे एजी पंप द्यावेत,' अशी मागणी त्यांनी रेटून धरली.

या चर्चेला उत्तर देताना महाराष्ट्राच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सोलर पंपांच्या सबसिडी व कार्यक्षमता बाबत माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या दालनात लवकरच उच्चस्तरीय बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

### शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे

आमदार सुधीर मुनगंटीवार हे नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. याआधी त्यांच्या पुढाकारातून चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विक्रमी २०२ कोटी रुपयांचा पीक विमा मिळवून देण्यात आला होता. अलीकडेच २० हजार हेक्टर प्रमाणे प्रत्येकी दोन हेक्टर धानाच्या बोनससंदर्भातील त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. ९३ कोटी रुपयांचा बोनस जिल्ह्यासाठी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत त्यांची संवेदनशीलता, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि लढण्याची तयारी हेच त्यांच्या कार्यशैलीचे खरे वैशिष्ट्य आहे.

# उद्योगविषयक बाबींचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : जिल्ह्यात उद्योगांना चालना देणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे तसेच 'एक जिल्हा एक उत्पादन' अंतर्गत निर्यात धोरण निश्चित करणे आदी बाबी संदर्भात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाचा आढावा घेण्यात आला.



जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्या, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा यांच्यासह विविध उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, उद्योगांमध्ये ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. जिल्ह्यात सर्व उद्योगांनी या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. याबाबत कोणतीही तक्रार येऊ देऊ नका. कंत्राटदारांकडून भरती प्रक्रिया होत असल्यास संबंधित कंत्राटदारानेसुध्दा या नियमाचे तंतोतंत पालन करावे. स्थानिक लोकांना रोजगार पुरविण्यासंदर्भातील वार्षिक अहवाल महाव्यवस्थापक यांच्याकडे सादर करावा.

उद्योगांना मनुष्यबळ पुरविण्यासाठी विविध प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहेत.

ज्या उद्योगांना अशा प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास त्यांनी जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क करावा. सन २०२४-२५ मध्ये कंपन्यांनी खर्च केलेल्या सामाजिक दायित्व निधीबाबत (सी.एस.आर.) सर्व कंपन्यांचा आढावा, तसेच सन २०२५-२६ च्या खर्च नियोजनाबाबतचा अहवाल त्वरीत सादर करावा, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

चंद्रपूर जिल्ह्यातील मागील वर्षी २० टक्क्यांनी वाढलेली निर्यात व यावर्षी निर्यात वाढीकरीता उपाययोजना करणे, तसेच 'एक जिल्हा एक उत्पादन' अंतर्गत जिल्ह्यातील तांदूळ आणि बांबू प्राधान्याने निर्यात व्हावे, याबाबत आढावा घेण्यात आला.

चंद्रपूरमध्ये टेस्टिंग लॅब, मुल येथे लॉजिस्टिक हब तसेच बँक ऑफ इंडिया, चंद्रपूर येथे परकीय चलन कक्ष प्रस्तावित असून चंद्रपूर जिल्ह्यातील निर्यात वाढीकरीता खुप फायदेशीर ठरणार असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्या यांनी सांगितले.

# आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीसाठी शेतकरी संघटना सज्ज - कपिल इद्दे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ४ जुलै** : पावसाळ्या नंतर होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी करिता सर्व पक्षाचे नेते मंडळी सोबत इच्छुक उमेदवार प्रतीक्षेत आहे. त्याकरिता सर्वच पक्षाचे नेतेमंडळी आतापासून मोर्चाबांधणी करीत असल्याचे दिसून येत आहे. नेते मंडळी आपल्या पक्ष्याच्या कार्यकर्ते सोबत बैठका आयोजीत करून कार्यकर्ताशी संवाद साधताना दिसून येते.



राजुरा विधानसभा क्षेत्रात कॉंग्रेस, शेतकरी संघटना आणि भाजपचे वर्चस्व आहे. त्यासोबत काही भागात शिवसेना (उबाठा) आणि गोंडवाना गणतंत्र पार्टीचे प्रभाव आहे. मागील विधानसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेचे उमेदवार वामनराव चटप यांना ५० हजारच्या वर मत प्राप्त झाले. वामनराव चटप हे मागील निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकावर असले तरी एका अपक्ष उमेदवाराला ५० हजारच्या मत प्राप्त होणे ही साधी गोष्ट नाही.

आजही राजुरा विधानसभा क्षेत्रात शेतकरी संघटनेचे हाडामासाचे कार्यकर्ते वामनराव चटप यांच्या सोबत आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत शेतकरी संघटना अधिक जोमाने मैदानात उतरेल अशी प्रतिक्रिया शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष कपिल इद्दे यांनी महासागर तालुका प्रतिनिधी जवळ दिली. आमचा पक्ष होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी सज्ज असून जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषदेकरिता नव्या उमेदीच्या व युवा चेहऱ्यांना संधी देऊन मागील निवडणुकी पेक्षा या निवडणुकीत चांगली कामगिरी करेल अशी आशा कपिल इद्दे यांनी व्यक्त केली.

एवढे मात्र खरे आहे कीं आजही राजुरा विधानसभा क्षेत्रात वामनराव चटप यांना मानणारा एक मोठा वर्ग आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शेतकरी संघटना निर्णायक भूमिका बजावणार यात काही शंका नाही.

# १ ते १५ जुलै या कालावधीत शाळाबाह्य बालकांची शोध मोहीम

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : केंद्र आणि राज्य शासन बालकांच्या नियमित शिक्षणासाठी तसेच बालके शाळाबाह्य होऊ नयेत यासाठी प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी १ ते १५ जुलै २०२५ या कालावधीत शोध मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, महानगरपालिका, नगर पालिका / पंचायत यांचे नोडल अधिकारी, पर्यवेक्षक व प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# चंद्रपूर महापालिकेत 'हाय सिवेज सक्शन मशीन' दाखल

### आधुनिक तंत्रज्ञानाने स्वच्छतेला येणार वेग



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : चंद्रपूर शहरात नाली सफाईचा कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, चंद्रपूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागात आजपासून 'ट्रक माउंटेड – हाय सिवेज सक्शन मशीन' कार्यान्वित करण्यात आली आहे.

सदर मशीनद्वारे आता शहरातील विविध भागांतील भूमिगत नाले, गटार, मेनहोल्स, व नाल्यांची सफाई अधिक जलद, कार्यक्षम आणि यांत्रिक पद्धतीने होणार आहे. पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या स्वच्छता कार्यात लागणारा वेळ आणि श्रम यामध्ये मोठ्या प्रमाणात बचत होणार असून, विशेषतः पावसाळ्यातील नालेसफाई अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात व स्वच्छता विभागाच्या देखरेखीखाली मशीनचे ट्रायल रन करण्यात आले.

यावेळी मशीनची शोषण क्षमता, दाब नियंत्रण, आणि जलप्रवाह व्यवस्थापन याची तपासणी करण्यात आली.सदर मशीनची क्षमता ही ४००० लिटरची असुन बंद गटारांमधून त्वरित सांडपाणी काढण्यासाठी, पावसाळ्यात नाले तुंबल्यास तत्काळ सफाईसाठी, गंध व दुर्गंधीमुक्त परिसर राखण्यासाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. सीवेज लाइन्स, ड्रेनेज सिस्टीम आणि इतर भागातील मलबा, गाळ आणि द्रव काढण्यासाठी हे मशीन शक्तिशाली सक्शन वापरते. मनपाच्या वतीने ही आधुनिक मशीन सार्वजनिक सेवेसाठी समर्पित

### हे कसे कार्य करते:

मशीनमध्ये एक शक्तिशाली सक्शन पंप आहे जो नोजल किंवा ट्यूबद्वारे सीवेज लाइनमध्ये सक्शन तयार करतो. हे सक्शन मशीनच्या टाकीमध्ये चिखल आणि द्रव खेचते. नंतर टाकी रिकामी करून ती कचरा विल्हेवाटीसाठी नेली जाऊ शकते.

### फायदे:

**कार्यक्षमता:** ही मशीन कमी वेळेत सांडपाणी साफ करू शकते.

**परिणामकारकता:** ही मशीन मोठ्या प्रमाणातील नालीचा गाळ व चिखल देखील काढू शकते.

**सुरक्षा:** ही मशीन सफाई कामगारांना धोकादायक परिस्थितीत काम करण्यापासून वाचवते.

**पर्यावरण संरक्षण:** हे यंत्र सांडपाणी स्वच्छ करून पर्यावरणाचे प्रदूषणापासून संरक्षण करते.

**खर्च प्रभावी:** या यंत्रामुळे सांडपाणी साफ करण्याचा खर्च कमी होऊ शकतो.

# देशी दारू दुकानाचे ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : कोरपनाच्या वॉर्ड क्रमांक २ मधील देशी दारू दुकानासाठी नगरपालिका प्रशासनाने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. परंतु ज्या जागेवर हे दुकान उभारले जात आहे तो परिसर निवासी आहे. नगरपालिका प्रशासनाने परिसरातील नागरिकांना अंधारात ठेवून हे ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. स्थानिक नागरिक महानगरपालिका प्रशासनाने दुकानाला दिलेल्या पत्राचा आणि मंजुरीचा तीव्र विरोध करत आहेत. या संदर्भात शुक्रवारी जिल्हा दंडाधिकारी आणि उत्पादन शुल्क विभागाला पत्र देऊन देशी दारू दुकानाला विरोध दर्शविला आहे. अन्यथा अमोल रासेकर यांनी पत्रकार परिषदेद्वारे स्थानिक परिसरातील नागरिकांसह महानगरपालिकेसमोर बेमुदत उपोषण करण्याचे संकेत दिले आहेत.

रासेकर म्हणाले की, कोरपना शहरात १९९२ पासून देशी दारूमुक्त करण्यासाठी कोरपना ग्रामपंचायतीने ग्रामसभेचा प्रस्ताव घेऊन देशी दारू दुकान बंद केले. त्यानंतर २०१२ मध्ये खोब्रागडे यांनी सरकारी देशी दारू दुकानासाठी ना हरकत पत्र दिले होते. त्यावेळीही परिसरातील नागरिकांनी विरोध केला होता. २०२२ मध्ये नगर पंचायतीने एका दुकानाला ना हरकत पत्र दिले होते. आणि आता २८ मे रोजी प्रेम लिकर प्रायव्हेट लिमिटेडने नगरपालिकेने देशी दारू दुकानाला दिलेल्या ना हरकत पत्रामुळे गावात नाराजी आहे. हे दुकान निवासी परीसरात सुरू होत आहे. त्यामुळे वसाहतीतील सामान्य नागरिकांना मद्यपींच्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे शुक्रवारी परिसरातील महिला आणि पुरुषांनी एकत्र येऊन जिल्हा दंडाधिकारी आणि उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षकांची भेट घेतली आणि दुकानाला दिलेला ना हरकत पत्र रद्द करण्याची मागणी केली. ना-हरकत प्रमाणपत्र रद्द ने केल्यास अमोल रासेकर आणि नागरीकों नी कोरपना नगरपालिकेसमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. पत्रकार परिषदेत मोहब्बत खान, अमोल रासेकर, प्रभाकर मोहितकर, पद्माकर मोहितकर, भानुपात्रा मोहितकर, सुनील बावणे उपस्थित होते.

# चंद्रपूर आणि घुग्घूसमधील हजारो घरांचे मालकी हक्क रखडलेले, स्थायी पट्टे द्या - आ. किशोर जोरगेवार

### अधिवेशनात मागणी, बुधवारी महसूलमंत्री घेणार बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ४ जुलै** : चंद्रपूर आणि घुघ्घुस येथील नागरिक मागील ५०–६० वर्षांपासून नझुल जागेवर वास्तव्यास असूनही, त्यांना अतिक्रमणधारक म्हणून नोटिसा पाठवून बेघर करण्याचे काम सुरू आहे. हा अन्याय आहे. अशा नझुलधारकांना कायमस्वरूपी पट्टे देण्यात यावेत, अशी मागणी पावसाळी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. या बाबत येत्या बुधवारी बैठक घेण्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे.




मुंबई येथे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात काल गुरुवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगारांचा प्रश्न उपस्थित केला होता.

तर आज लक्षवेधी सूचनेवर बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर आणि घुग्घूस येथील नझुलधारकांच्या प्रश्नांकडे सभागृहाचे लक्ष वेधत त्यांच्या मागण्या सभागृहापुढे मांडल्या.

चंद्रपूर महानगरपालिका आणि घुघ्घुस नगरपरिषद हद्दीतील हजारो नागरिक गेल्या अनेक दशकांपासून शासनाच्या जमिनीवर घरे बांधून वास्तव्यास आहेत. तरीही त्यांना अद्याप शासकीय नोंदीत मालकी हक्क मिळालेला नाही.

या संदर्भात सभागृहात बोलताना आमदार जोरगेवार म्हणाले की, चंद्रपूर शहरातील ३९ झोपडपट्टीमध्ये एकूण ११,८८१ घरांचा प्रश्न आहे.

यापैकी २५ झोपडपट्टी इम्प्रुव्हमेंट स्कीमच्या नकाशांना मंजुरी मिळाली आहे, तर उर्वरित १४ नकाशे अद्याप मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. नगर परिषद घुघ्घुसमध्ये अनेक कुटुंबे शासकीय जमिनीवर राहत असून सुमारे १३०० कुटुंबियांना अतिक्रमण नोटीसा बजावण्यात आलेल्या असून घरे खाली करण्याच्या सूचना केल्या आहे. त्यामुळे जवळपास ४ ते ५ हजार रहिवासी विस्थापित होण्याची शक्यता आहे.

तसेच त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत.

त्यामुळे आता नझूल धारकांना कायमस्वरूपी पट्टे देण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच या विषयावर जिल्हाधिकारी, घुग्घूस नगरपरिषद, तहसीलदार आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह तातडीने बैठक घेऊन तोडगा काढावा, अशी सूचना देखील आमदार जोरगेवार यांनी अधिवेशनात केली.

त्यांच्या या मागणीनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येत्या बुधवारी बैठक घेण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पट्ट्यांचा प्रश्न मार्गी लागेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३९८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# बालांगण

## घाबरू नका, तक्रार करा

टेक केअर

छोट्यांनो, आपल्या आसपास बरेच गुन्हे घडत असतात. हिंसाचार होतो. बरेच लोक लहान मुलांना त्रास देतात. त्यांना चिडवतात. काही वेळा मारहाण केली जाते. यामुळे मुलं घाबरून जातात. तुम्हाला कोणी शाळेत त्रास देऊ शकतं. तुमचे शेजारीपाजारीही त्रास देऊ शकतात.

वेगवेगळ्या पद्धतींनी त्रास दिला जातो. काहींना मारहाण होते, हा शारीरिक त्रास असतो. काहींना चिडवलं जातं, घरी नाव सांगू असं सतत सांगितलं जातं. याचा तुमच्या मनावर परिणाम होतो. त्यामुळे याला भावनिक किंवा मानसिक हिंसाचार असं म्हणता येईल. सध्या ट्रोलिंग हा शब्द प्रचलित आहे. प्रसिद्ध व्यक्तीच नाही तर सोशल मीडियावर ॲक्टिव्ह



असणाऱ्या सामान्यांनाही ट्रोल केलं जातं. कोणाला कपड्यांवरून चिडवलं जातं तर कोणाची प्रतिक्रिया आवडली नाही म्हणून खडे बोल सुनावले जातात. हा मानसिक त्रासाचाच एक प्रकार म्हणायला हवा. मस्करी करणं, एखाद्याला एकटं पाडणं हा सुद्धा हिंसाचारच म्हणायला हवा.

शारीरिक हिंसाचारात मारहाण केली जाते. उगाचच घालून-पाडून बोललं जातं. शाळेतली मोठी मुलं लहानग्यांना असा त्रास देतात. मात्र यामुळे घाबरून न जाता शिक्षकांकडे अशा मुलांची तक्रार करायला हवी. आपण काही चुकीचं वागलो नसलो तर काळजीचं काहीच कारण नाही. लहान मुलांशी संबंधित हिंसाचारात वाढ होत आहे. त्यामुळे सर्वच लहानग्यांनी काळजी घ्यायला हवी.

## व्हिटॅमिन सी कशात जास्त?

फिटनेस फंडा



छोट्या दोस्तांनो, उत्तम आरोग्यासाठी आवश्यक असणारे व्हिटॅमिन सी मिळवण्यासाठी लिंबू, आवळा किंवा पेरू यापैकी कोणता पर्याय चांगला याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? अनेकांना लिंबू व्हिटॅमिन-सी चा सर्वोत्तम स्रोत असल्याचे वाटते. परंतु हे पूर्णपणे खरे नाही. तेव्हा याबद्दल पोषणतज्ज्ञ काय म्हणतात हे आज जाणून घेऊ या.

**व्हिटॅमिन-सी का महत्त्वाचे आहे?**

व्हिटॅमिन-सी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, त्वचा निरोगी ठेवते, जखमा बरे करण्यास मदत करते तसेच अँटीऑक्सिडंट म्हणून देखील कार्य करते. त्यामुळेच ते शरीरासाठी अत्यावश्यक असते. त्याच्या कमतरतेमुळे अनेक प्रकारच्या आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

**हे लक्षात घेता आपण** १०० ग्रॅम या मापामध्ये व्हिटॅमिन सी बद्दल बोलायचे ठरवले तर आकडे खालीलप्रमाणे असतात.


एका लिंबामध्ये ५३ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते. पेरूमध्ये हेच प्रमाण २२८.३ मिलीग्राम इतके असते तर आवळ्यामध्ये हे प्रमाण तब्बल ३०० मिलीग्राम इतके असते.

तेव्हा या आकड्यांवरूनच स्पष्ट होते की आवळा व्हिटॅमिन सी चे सर्वात मोठा भांडार आहे. त्यानंतर पेरू आणि नंतर लिंबाचा नंबर लागतो. अर्थात आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी चे प्रमाण सर्वाधिक असले तरी एका वेळी १०० ग्रॅम आवळा खाणे प्रत्येकासाठी सोपे नाही. आवळ्याला तुरट चव असते. तसेच कच्चे आवळे खाणारे लोक खूप कमी असतात. बरेचदा रस किंवा लोणच्याच्या स्वरूपातच आवळ्याचा वापर केला जातो. पेरू मात्र आपण सहज खाऊ शकतो. त्याची चव गोड आणि किंचित आंबट असल्यामुळे तुमच्यासारख्या लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत पेरू सर्वांनाच आवडतो. तुम्ही एका वेळी १०० ग्रॅम किंवा त्याहून अधिक वजनाचा पेरू सहजपणे खाऊ शकता. अशा प्रकारे आपल्याला कोणत्याही समस्येशिवाय भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी मिळू शकते.

## अशी आहे ॲड्रेसची गंमत

टेक्नो टिप्स

छोट्या दोस्तांनो, तुम्ही आयपी ॲड्रेस हा शब्द ऐकला असेल. आयपी ॲड्रेस म्हणजे इंटरनेट प्रोटोकॉल ॲड्रेस. कॉम्प्युटर नेटवर्कशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक उपकरणाला काही आकडे दिले जातात. हे आकडे म्हणजे त्या उपकरणाचा आयपी ॲड्रेस.





प्रत्येक उपकरणाचा आयपी ॲड्रेस वेगळा असतो. त्यामुळे इंटरनेटशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक उपकरणाची ओळख पटवणं सोपं जातं. तुमच्या घरच्या वायफायशी कॉम्प्युटर, मोबाईल फोन, लॅपटॉप जोडलेला असतो. या प्रत्येक उपकरणाचा आयपी ॲड्रेस वेगळा असतो.

आयपी ॲड्रेस दोन प्रकारचे असतात. आयपीव्ही ४ आणि आयपीव्ही ६. समजा तुम्ही फिरायला जाणार आहात. सोबत तुम्ही लॅपटॉप घेतला आहे. अशा वेळी तुमच्या घरचा आयपी ॲड्रेस लॅपटॉपमध्ये दिसणार नाही. कारण बाहेर गेल्यावर तुम्ही दुसरं इंटरनेट किंवा वायफाय कनेक्शन वापरणार आहात. त्यामुळे तुम्हाला तात्पुरता आयपी ॲड्रेस मिळेल. ते ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर पुन्हा नवा आयपी ॲड्रेस दिला जाईल. तर मंडळी, आयपी ॲड्रेसची ही अशी गंमत आहे.

## भूगोलात कारकीर्द घडवणार?

कोण होणार?

मुलांनो, तुम्ही भूगोल शिकता. हा विषय आवडत असेल तर त्यात उच्च शिक्षणही घेता येईल. भूगोलाशी संबंधित विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. जिओग्राफी, हायड्रोग्राफी तसंच आयटीमधली पदवी मिळवून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता.




आता जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिमचा आवाका खूपच वाढला आहे. स्मार्ट गाइडन्स सिस्टिम तयार करण्यापासून नैसर्गिक स्रोतांचा शोध घेण्यासाठी उपग्रहांची मदत घेईपर्यंत बऱ्याच गोष्टींसाठी भूगोलाची मदत घ्यावी लागते.

बारावीनंतर या क्षेत्रात विविध अभ्यासक्रम करता येतील. जियोइन्फॉर्मेटिक्स मध्ये बीई, रिमोट सेन्सिगमध्ये बीई किंवा बीटेक, जीआयएस अँड रिमोट सेन्सिंगमध्ये बीटेक करून पुढे जाता येईल. नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर, इंडियन रिमोट सेंसिंग एजन्सी, प्लॅनिंग कमिशन, जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, युनिक आयडेंटिफिकेशन ॲथोरिटी ऑफ इंडिया आदी संस्थांमध्ये तुम्ही काम करू शकता.

## असा असतो क्यूआर कोड

तंत्रज्ञान

छोट्यांनो, सध्या विविध ठिकाणी क्यूआर कोडचा वापर होतो. आर्थिक व्यवहारांसाठी, ॲप डाउनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा लागतो. या छोट्याशा कोडमध्ये बरीच माहिती दिलेली असते. बऱ्याच लोकांची माहिती व्ही कार्डमध्ये सेव्ह झालेली असते. यात फोन नंबर, नाव, टोपण नाव, कंपनीचं नाव अशी बरीच माहिती असते. त्याला 'बिझनेस कार्ड' किंवा 'व्ही कार्ड' असं म्हणतात. हे व्ही कार्ड म्हणजे एकप्रकारचा क्यूआर कोडच आहे. असा कोड तयार करण्याची प्रक्रिया अगदी सोपी आहे.


विविध पेमेंट ॲप्समध्ये एक चौकोन असतो. या चौकोनात काळ्या रंगाचं नक्षीकाम पहायला मिळतं. हा क्यूआर कोड असतो. तो स्कॅन केल्यावर आपल्याला सगळी माहिती मिळते.



क्यूआर कोड उपलब्ध करून देणाऱ्या वेबसाईट्स आहेत. युजर्सना गूगलमध्ये जाऊन क्यूआर कोड जनरेट टाईप करावं लागेल. यानंतर तुमच्यासमोर बऱ्याच वेबसाईट्स ओपन होतील.

या वेबसाईटमध्ये गेल्यावर व्ही कार्डचा पर्याय दिसतो. यात तुमची सगळी माहिती भरावी लागेल. यानंतर क्यूआर कोड जनरेट या पर्यायावर क्लिक करा. आता तुमची सगळी माहिती क्यूआर कोडच्या रुपात सेव्ह होईल. हा कोड स्कॅन केल्याशिवाय कोणालाही ही माहिती बघता येणार नाही. फोनमधल्या कॅमेऱ्यात क्यूआर कोड स्कॅनरचा पर्याय असतो.

ठिपके जुळवा



## खिडक्या गोलाकार कशासाठी?

वाचा तर खरं

सध्या विमान प्रवासाबद्दल सगळीकडेच चर्चा सुरू आहे. चला तर मग, आज आपणही विमानातील एका भागाबद्दल जाणून घेऊ या. मित्रांनो, आपण विमानाने प्रवास करतो तेव्हा खिडकीजवळची सीट मिळाल्यास खूप आनंद होतो. अनेकजण ती जागा मागून घेतात. पण तुम्ही कधी लक्षात घेतले आहे का की, विमानाच्या खिडक्या नेहमी गोल किंवा वक्र का असतात? सामान्य बस किंवा ट्रेनच्या खिडक्यांप्रमाणे त्यांना कोणताही कोपरा दिसत नाही. मित्रांनो, या मागे काही वैज्ञानिक कारणे आहेत, हे सर्वप्रथम लक्षात घ्या.

विमान जमिनीवरुन उडते तेव्हा बाहेरील हवेचा दाब बदलतो पण आतल्या केबिनचा दाब मात्र नियंत्रणात राहतो. हा फरक प्रत्येक उड्डाणात तुम्हीही अनुभवला असेल. तेव्हा गोल खिडक्यांची रचनाच कमी-जास्त होणारा दाब नियंत्रित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असते. खिडकाचा हा ठराविक साचा बदलत्या दाबात चांगली काम करतो आणि त्या तुटण्याची शक्यता कमी असते.



विमान खूप उंचीवर उडते तेव्हा अर्थातच संपूर्ण संरचनेवर खूप दबाव असतो. असे असताना खिडक्या चौकोनी असत्या तर कोपऱ्यांवर हा दाब जास्त पडला असता आणि तिथून त्या क्रॅक होण्याची शक्यता वाढली असती. गोल खिडक्या हा दाब समान प्रमाणात वितरीत करतात. त्यामुळे विमानाची रचना सुरक्षित राहते. प्रत्येक उड्डाणात विमानाच्या संरचनेला दबाव सहन करावा लागत असल्यामुळे कालांतराने धातू कमकुवत होऊ शकतो. पण गोल खिडक्यांमुळे दाबाचा परिणाम कमी होतो आणि संपूर्ण विमानाचे शेल्फ-लाइफ वाढते. यामुळे देखभालीचा खर्चही कमी होतो.

कोणत्याही कारणास्तव विमानाची खिडकी खराब झाली तर ही बाब प्रवाशांसाठी खूपच धोकादायक ठरू शकते. अशा आपत्कालीन परिस्थितीत गोल खिडक्यांची मजबूत रचना अधिक सुरक्षित असते. म्हणूनच ही केवळ एक रचना नाही तर प्रवाशांच्या सुरक्षिततेचा एक महत्त्वाचा भाग देखील आहे. त्याचबरोबर गोलाकार खिडक्या अधिक आकर्षक दिसतात. त्या विमानाच्या गोल आणि वायुगतिकीय डिझाइनशी चांगल्या जुळतात.

## अंडी खाताय?

करुन पाहा

मांसाहारी लोकांच्या आहारातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे अंडी. त्यापासून अनेक पदार्थ बनवले जातात आणि ते अनेक प्रकारे बनवले जातात. अंडी आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतात. पण कधीकधी अंडी खराब होतात आणि आपल्याला कळतही नाही. असे एकही खराब अंडे डिशमध्ये गेले तर मात्र संपूर्ण अन्न खराब होते. खराब अंडी खाल्ल्याने विषबाधा देखील होऊ शकते. म्हणूनच अंडी न फोडता खराब झाली आहे की ताजी आहेत हे समजण्याच्या काही टिप्स आज पाहू या. यामुळे आई घरात नसतानाही तुम्ही योग्य अंडे निवडून एखादा झटपट पदार्थ करु शकता.



अंडी ताजी आहेत की नाही हे जाणून घेण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे आधी एक ग्लास थंड पाणी घ्या आणि त्यात हलक्या हाताने अंडी घाला. अंडी ताजी असतील तर पाण्याच्या तळाशी बसतील आणि जुनी असतील तर वर येतील. म्हणूनच अंडी पाण्याच्या पृष्ठभागावर पूर्णपणे तरंगू लागली तर ती खराब असल्याचे समजून घ्या.

यासाठी तुम्ही मेणबत्ती पद्धतही वापरु शकता. यासाठी मोबाईलची किंवा साधी टॉर्च वापरू शकता. आधी खोलीत अंधार करा आणि टॉर्च लावून त्या प्रकाशात अंडी फिरवा. अंडी पूर्णपणे स्वच्छ आणि कवचापासून पिवळी दिसत असतील तर ती ताजी असल्याचे समजून घ्या. परंतु अंडी खराब दिसत असेल तर चांगली नसल्याचे समजून घ्या.

अंड्याचा बाहेरील भाग पाहूनही तुम्ही त्याच्या गुणवत्तेचा अंदाज लावू शकता. जसे की, अंड्याचे कवच पूर्णपणे स्वच्छ, चमकदार आणि कोणतेही डाग नसलेले असेल तर ते ताजे असते. परंतु कवचावर भेगा, चिकटपणा आणि त्यावर काळे किंवा हिरवे डाग असतील तर अंडे खराब असू शकते.

मुलांनो, या सोप्या पद्धती वापरून तुम्ही घरी अंड्याची गुणवत्ता तपासू शकता. अंड्याबद्दल काही शंका असेल तर ते फेकून देणे चांगले.

## अर्थ जाणून घ्या

रंजक ज्ञान

घामाचा वास घालवण्यासाठी तसेच ताजेतवाने वाटण्यासाठी लोक परफ्यूम लावतात. तुम्हीही कधी कधी वापरत असाल. मित्रांनो, बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे परफ्यूम उपलब्ध असतात. त्याच्या बाटलीवर ईडीटी, ईडीसी आणि ईडीपी यापैकी एक शब्द लिहिलेला दिसतो. तेव्हा याचा अर्थ काय असतो बरं? आज जाणून घेऊ या.

खरं तर, परफ्यूमच्या बाटलीवर लिहिलेले हे शब्द परफ्यूममध्ये सुगंधी तेलाचे प्रमाण किती आहे, याबद्दल सांगतात. सुगंधी तेलाचे प्रमाण जास्त तितका त्याचा वास जास्त काळ टिकतो. म्हणूनच हे प्रमाण दर्शविण्यासाठी परफ्यूम बाटलीवर ईडीटी, ईडीसी आणि ईडीपी लिहिलेले असते.

ज्या परफ्यूमच्या बाटलीवर ईडीटी लिहिलेले असते त्यामध्ये सुगंधी तेलाचे प्रमाण केवळ ५ ते १५ टक्के असते. या प्रमाणात सुगंधी तेला असल्यामुळे या परफ्यूमचा सुगंध तीन ते पास तास टिकतो. म्हणूनच हे सुगंधी द्रव्य दैनंदिन वापरासाठी खरेदी करणे योग्य समजले जाते. त्याचा सुगंध हलका आणि ताजेतवाने करणारा असतो. अशा प्रकारचा परफ्यूम उन्हाळ्याच्या दिवसांसाठी योग्य मानला जातो.



परफ्यूमच्या बाटलीवर ईडीपी लिहिलेले असते तेव्हा त्यामध्ये मिसळलेल्या सुगंधी तेलाचे प्रमाण १५ ते २० टक्के असते. हा सर्वात तीव्र परफ्यूम समजला जातो तसेच त्याचा सुगंध पाच ते आठ तास टिकतो. अर्थातच सुगंधी तेलाचे प्रमाण जास्त असल्याने सुगंधही बराच काळ टिकतो. म्हणूनच अशा प्रकारचा परफ्यूम विशेष कार्यक्रम, पार्ट्या इत्यादींसाठी वापरला जातो.

परफ्यूम बाटल्यांवर ईडीसी लिहिलेले असते तेव्हा त्यात सुगंधी तेलांचे प्रमाण फक्त २ ते ५ टक्के असते. असे असल्यामुळेच हे सर्वात हलके परफ्यूम समजले जाते. कमी सुगंधी तेलामुळे त्याचा सुगंध लवकर निघून जातो. म्हणूनच ते वारंवार लावावे लागते. ते दररोजच्या वापराचे असते तसेच इतर परफ्यूमपेक्षा स्वस्त देखील असते. म्हणूनच दररोजचा वापर खिशालाही परवडतो.




### स्टडी टिप्स

#### लागा तयारीला



दोस्तांनो, तुम्ही सुट्टीत खूप धमाल केली असेल. पण आता अभ्यासाला लागायला हवं. दहावी-बारावीची मुलं तर आता बराच जोर लावतील. या मुलांनी आता अभ्यासावर, उजळणीवर भरपूर भर द्यायला हवा. अर्थात महत्त्वाची वर्षे असली तरी अजिबात घाबरू नका. शांतपणे अभ्यास करा. विषय समजून घ्या. आकलन उत्तम ठेवा. सराव करा. तुम्हाला चांगलं यश मिळेल.

### खादाडी


#### मस्त टोमॅटो ऑमलेट



दोस्तांनो, वेगळं काही खायचं असेल तर तुम्ही टोमॅटो ऑम्लेट बनवू शकता. यासाठी वाटीभर बेसन, कांदा, टोमॅटो, लाल तिखट, मीठ असं साहित्य घ्या. कांदा आणि टोमॅटो बारीक चिरून घ्या. डाळीच्या पिठामध्ये थोडं पाणी घाला. पीठ फार पातळ करायचं नाही हे लक्षात ठेवा. आता त्यात कांदा, टोमॅटो, तिखट, मीठ घाला. सगळे घटक नीट मिक्स करा. तवा घ्या. त्यावर थोडं तेल घाला. आता डाळीचं पीठ तव्यावर पसरवा. छोटी धिरडी घाला. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. सॉससोबत खा.

### दोस्त हे मस्त

#### असे हे कुत्रे



दोस्तांनो, कुत्रा हा इमानी प्राणी. हा प्राणी आसपास सहज आढळतो. त्यामुळे त्याच्याविषयी फारशी माहिती घ्यावीशी वाटत नाही. पण कुत्र्याबद्दलच्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. मुलांनो, 'मॅक्स' हे कुत्र्याचं नाव खूप प्रसिद्ध आहे. मॅक्स नावाच्या कुत्र्यांची संख्या बरीच जास्त आहे. कुत्र्यांची वास घेण्याची क्षमता खूप चांगली असते. यामुळे गुन्हेगारांचा शोध घेण्यात कुत्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. कुत्र्याला वेगवेगळ्या चवी फारशा कळत नसल्या तरी तो विविध प्रकारचे वास ओळखू शकतो.

### योगा टाईम

#### सूर्यभेदी प्राणायाम



दोस्तांनो, सध्या प्रदूषण बरंच वाढत आहे. प्रदूषणापासून बचाव करण्यासाठी तुम्ही काही आसनं करू शकता. त्यापैकी एक आसन म्हणजे सूर्यभेदी प्राणायाम. प्राणायामाबद्दल तुम्ही ऐकलं असेल. सूर्यभेदी प्राणायामामुळे श्वसनसंस्थेचे विकार दूर होतात. या आसनामुळे शरीर आणि मनाला शांती मिळते. हे आसन करण्यासाठी तुम्ही सुखासनात किंवा पद्मासनात बसू शकता.

